**अतारांकित प्रश्नोत्तरांची ४६ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## नागपूर येथील प्रादेशिक रुग्णालयाला नवीन इमारत देणेबाबत

**(१) १८७३ (०५-०५-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्ण रुग्णालय सन १८८४ मध्ये सुरु करण्यात आले असून त्याचे वॉर्ड विखुरलेल्या पध्दतीचे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील मनोरुग्णांच्या उपचार, सुविधा व देखभालीकडे लक्ष देण्यात प्रशासनाला अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील मनोरुग्णांसाठी अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (२९-०४-२०२६) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

मेंटल असायलम ॲक्ट १८५४ नुसार सन १८६४ पासून मनोरुग्णालय जबलपूर येथे कार्यरत होते. तद्नंतर सन १९०४ मध्ये सदर रुग्णालयाला स्थलांतरीत करुन नागपूर येथे प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर म्हणून स्थापित करण्यात आले.

सदर रुग्णालय ४२ एकर मध्ये विस्तारीत आहे. या मनोरुग्णालयात एकूण २३ वॉर्ड असून त्यापैकी स्त्री कक्ष व पुरुष कक्ष मिळून १६ वॉर्ड कार्यरत आहेत ७ वॉर्ड जुने व जीर्ण असून ते विखुरलेले व उर्वरित सद्यस्थितीत अकार्यरत आहेत. प्रत्येक कक्ष/ वॉर्ड स्वतंत्र व एकमेकापासून लांब आहेत. मनोरुग्णालयात कर्तव्यावर असणारे मनोचिकित्सक, वैद्यकिय अधिकारी, नर्सिंग स्टाफ, स्त्री/ पुरुष परिचर तसेच इतर सेवा देणारे कर्मचारी यांच्यामार्फत आवश्यक संपूर्ण परिसरात कक्षनिहाय रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.

(३) वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर यांनी प्रादेशिक मनोरुग्णालयाचे निम्हांस बंगलोरच्या धर्तीवर अत्याधुनिक बांधकाम करण्याबाबत कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक (वैद्यकिय), सार्वनजिक बाधकाम विभाग, टि.बी.वार्ड परिसर, नागपूर यांचेकडे नकाशे, आराखडा व रुग्णालय उभारणीकरीता लागणारे अंदाजपत्रक प्राप्त करण्याबाबत दिनांक ०६/०९/२०२४, दिनांक २४/०९/२०२४ दिनांक ०७/१०/२०२४ व ०५/०३/२०२४ रोजी पत्र पाठविलेले आहे.

सार्वनजिक बांधकाम विभाग, टि.बी. वार्ड परिसर, नागपूर यांच्याकडून अंदाजपत्रक प्राप्त झाल्यानंतर वैद्यकीय अधिक्षक, प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर यांच्याकडून प्राप्त प्रस्तावानुसार आयुक्तालयामार्फत शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यास अंदाजपत्रक तपासून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंहगड किल्ला घेरा (ता. हवेली, जि.पुणे) येथील पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(२) १९९९ (२४-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड किल्ला घेरा (ता. हवेली, जि.पुणे) येथील पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाव हे जिल्हा परिषदेच्या सन २०२२-२३ च्या जलजीवन मिशन अंतर्गत आराखड्यात समाविष्ट असून या योजनेस स्टेट लेव्हल टेकनिकल सॅक्शनिंग कमिटी (SLSSC) मध्ये देखील मंजूरी प्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे सविस्तर आराखडे तयार झाले असून विभाग क्र.२ पुणे कार्यालयाने निविदा प्रक्रिया देखील पूर्ण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर योजनेस निधी उपलब्ध नसतांनाही प्रशासकीय मान्यतेशिवाय निविदा काढण्यात आल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार योजनेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून पुर्ननिविदा काढणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२७-०४-२०२६) :** (१) सिंहगड किल्ला घेरा ता. हवेली, जि.पुणे सिंहगड पाणीपुरवठा योजना प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करुन अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकीय मंजुरी करीता शासनास सादर केले असता त्यासंदर्भात काही त्रुटी असल्याने त्याबाबत परिपूर्ण प्रस्ताव मागितला. दरम्यानच्या कालावधीत केंद्र शासनाने कार्यादेश निर्गमित करण्यास माहे मार्च, २०२४ पर्यंतच मुदतवाढ देण्यात येत असल्याचे कळविले. त्यानुसार विहीत मुदत संपल्यामुळे प्रशासकीय मान्यता देणे शक्य झाले नाही.

तथापि, सदर योजनेचा समावेश सिंहगड किल्ला विकास आराखड्यामध्ये करण्यात आला असून मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/०६/२०२५ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीमध्ये सदर योजनेस मंजुरी प्राप्त झाली असून सदरचा आराखडा दिनांक १८/०६/२०२५ रोजी शिखर समितीच्या मंजुरीकरिता सादर करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जल जीवन मिशन अंतर्गत या गावाची पाणी पुरवठा योजनेची कामे जलद गतीने विहीत कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली.

(५) व (६) प्रशासकीय मान्यतेच्या अधीन राहून निविदा प्रसिध्द करण्यात आली असल्याने उक्त प्रकरणी शासनो चौकशी करण्याविषयी प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, तद्नंतर केंद्र शासनाने कळविल्यानुसार विहीत मुदत संपल्याने प्रशासकीय मान्यता देणे शक्य झाले नाही. मात्र, ही पाणीपुरवठा योजना पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून हे काम जलजीवन मिशन ऐवजी सिंहगड किल्ला विकास आराखडा योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. याअंतर्गत शिखर समितीची मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## राज्यातील ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन लागू करणेबाबत

**(३) २८४३ (१८-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन लागू करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (औसा) यांनी तत्कालीन मा.ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२३-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ६१ अनुसार ग्रामपंचायतींना त्यांचे कर्मचारी नेमण्याचे संपूर्ण अधिकार आहेत. ग्रामीण पातळीवर आपले सरकार कक्षामध्ये कंत्राटी पद्धतीने कार्यरत संगणक परिचालक हे ग्रामपंचायतीचे कर्मचारी नाहीत. त्यांची नेमणूक बाह्य यंत्रणे मार्फत आपले सरकार कक्ष या कार्यासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या सी.एस.सी.कंपनी मार्फत करण्यात आली आहे. यावलकर समितीने देखील आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील कार्यरत संगणक परिचालक यांना ग्रामपंचायतींमध्ये सामावून घेऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागातील नवोदित उद्योजक, होतकरु युवक यांना व्यवसाय व रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) ६२९१ (२४-०४-२०२५). श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुंतवणूक करण्यासाठी दावोस येथील जागतिक आर्थिक फोरम परिषदेमध्ये शासन प्रयत्न करत असल्यामुळे अनेक कंपन्या राज्यात गुंतवणूक करण्यासाठी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात रोजगार निर्मिती संदर्भात फक्त चर्चा होत असून प्रत्यक्षात ग्रामीण भागातील बेरोजगारांना नोकरी मिळत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ग्रामीण भागातील नवोदित उद्योजक, होतकरु युवक यांना व्यवसाय व रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने शासनाचे धोरण काय आहे किंवा काही नवीन धोरण ठरविण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, या आर्थिक वर्षामध्ये त्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०४-२०२६) :** (१) व (२) जागतिक आर्थिक परिषद ही सार्वजनिक/खाजगी सहकार्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना आहे, जी भागीदारामध्ये विश्वास प्रस्तावित करण्यासाठी सहकार्य आणि प्रगतीसाठी पुढाकार घेणारी नि:पक्ष व ना नफा ना तोटा या तत्वावर कार्य करणारे एक जागतिक व्यासपीठ आहे. सदर परिषदेचे दरवर्षी माहे जानेवारी मध्ये दावोस, स्वित्झलँड येथे आयोजन करण्यात येते. सदर परिषदेमध्ये जगातील विविध देशांचे उद्योजक तसेच वरिष्ठ अधिकारी, माध्यमांचे प्रतिनिधी यांचे शिष्टमंडळे व्यापारवृध्दी व

गुंतवणूकीच्या उद्देशाने सहभागी होत असतात. ३००० पेक्षा जास्त कंपन्याचे प्रतिनिधी सदर परिषदेमध्ये दरवर्षी सहभागी होत असतात.

जागतिक आर्थिक परिषदेमध्ये मागील काही वर्षात राज्य शासनामार्फत करण्यात आलेले सामंजस्य करार व त्याची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | सामंजस्य करार संख्या | गुंतवणूक रु. कोटीत | रोजगारनिर्मिती प्रत्यक्ष अप्रत्यक्ष | अंमलबजावणीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २०२२ | २५ | ८०,५८८ | १ लक्ष | ९८ |
| २ | २०२३ | १९ | १,३७,३९३ | १ लक्ष | ८० |
| ३ | २०२४ | २४ | ३,१६,७३९ | २ लक्ष | ७० |
| ४ | २०२५ | ४८ | १२,२३,०८१ | ५.५ लक्ष | ८८ |
| ५ | २०२६ | ७८ | ३१,२५,८८२ | ४० लक्ष | -- |

सदर सामंजस्य करारामध्ये स्टील, माहिती व तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, ऑटोमोबाईल्स आणि इलेक्ट्रिक वाहने, वस्त्रोद्योग, डेटा सेंटर्स, इलेक्ट्रॉनिक्स, अवकाश आणि संरक्षण, जैवतंत्रज्ञान आणि औषधनिर्मिती, शितपेये, पायाभूत सुविधा, ड्रोन उत्पादन, शिक्षण, पर्यटन इत्यादी क्षेत्रातील नामांकित कंपन्यांचा समावेश आहे.

सामंजस्य करार केलेल्या प्रकल्पाचा गुंतवणूक कालावधी हा ५ ते १० वर्षाचा असतो.त्यामुळे सदर प्रकल्पातून प्रत्यक्ष उत्पादन निर्मिती व रोजगारनिर्मिती होण्यास थोडा कालावधी लागत असतो.

माहे डिसेंबर, २०२५ अखेर दावोस येथे झालेल्या सामंजस्य करारांपैकी सरासरी ८०% सामंजस्य करार अंमलबजावणीच्या विविध टप्प्यावर कार्यरत आहेत.

(३) व (४) राज्यामध्ये उद्योगांचा समतोल विकास होण्यासाठी व कमी विकसित भागात उद्योगधंदे स्थापित व्हावे या कारणास्तव राज्यामध्ये सन १९६४ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येते. प्रचलित सा.प्रो.यो. २०१९ ही दिनांक १६.०९.२०१९ च्या शासन निर्णयाने जाहिर करण्यात आली आहे. प्रचलित योजनोचा कालावधी १ एप्रिल, २०१९ ते ३१ मार्च, २०२४ पर्यंत किंवा नवीन सामुहिक प्रोत्साहन योजना अंमलात येईपर्यंत आहे. राज्यातील वैयक्तिक, भागीदारी, खाजगी क्षेत्र, सहकारी संस्था यांनी स्थापित केलेल उद्योग घटक सामुहिक प्रोत्साहन योजना -२०१९ अंतर्गत समाविष्ट केलेले आहेत.

सदर योजनेअंतर्गत विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत कर अनुदान, व्याज अनुदान, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान तसेच गुणात्मक स्पर्धात्मकता, संशोधन व विकास कार्य आणि तांत्रिक श्रेणीमध्ये वाढ, पाणी व ऊर्जा संरक्षण, पत मुल्यांकन याकरिता सवलती देय आहेत.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत रु. ६४०० कोटी इतक्या निधीची तरतुद शासनातर्फे करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासींचे आरोग्य चांगले राहावे याकरिता तज्ञ समिती स्थापन करण्यात येणार असल्याबाबत**

**(५) ७५५२ (०८-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी लोकांचे आरोग्य चांगले राहावे याकरिता तज्ञ समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, प्राप्त अहवालानुसार आदिवासींचे आरोग्या सुधारण्यासाठी शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत?

**श्री. प्रकाश आबिटकर (१८-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

आदिवासी भागातील आरोग्य विषयक बाबींचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक २७ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे.
(२) व (३) सदर समितीकडून राज्यातील आदिवासी क्षेत्रातील जनतेच्या आरोग्य समस्यांवरील उपायोजना सुचविण्याकरिता त्या त्या भागातील भौगोलीक परिस्थिती, प्रथा, सामाजिक परिस्थिती व मान्यता, आर्थिक क्षमता, उपलब्ध पायभूत सुविधा इत्यादी बाबींची प्रत्यक्ष भेटी देवून माहिती एकत्रित करण्यात येत आहे. सदर प्राप्त माहितीचा अभ्यास करुन आदिवासी भागातील आरोग्य विषयक समस्यांवर उपाययोजना सुचविण्यासाठी अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदगाव पेठ (जि. अमरावती) येथील MIDC मध्ये मिसाईल निर्मितीचे काम उद्योग विभागाच्या समन्वय अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(६) १३३६८ (१९-०९-२०२५). श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हातील नांदगाव पेठ (जि. अमरावती) येथील MIDC मध्ये भारत सरकारचा सार्वजनिक उपक्रम असलेली भारत डायनामिक्स ली.(BDL) द्वारे मिसाईल निर्मिती कारखान्याची घोषणा करण्यात येऊन BDL ला अंदाजित ८०० एकराचा मोठा भूखंड सन २०१२ मध्ये उद्योग विभागाद्वारे देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आज तब्बल तेरा वर्षाच्या कालावधी होऊनही BDL कंपनी द्वारे संपूर्ण भूखंडाला कुंपण भिंत बांधण्यात आली आहे मात्र अद्याप कारखाना सुरु करणेबाबत कोणत्याही हालचाली करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्योग विभागाद्वारे कंपनी सार्वजनिक उपक्रम असून सुद्धा उद्योग उभारण्यास इतका विलंब होण्याची कारणे काय आहेत, याबाबत समन्वय साधण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याच BDL द्वारे तेलंगाना राज्यातील इब्राहीम पट्टनम येथे अमरावती नंतर प्रकल्पाची घोषणा करून गेल्या तीन वर्षा आधीच या प्रकल्पातून मिसाईल निर्मिती सुद्धा सुरु झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अन्य मोठ्या महात्वाकांक्षी उद्योजकांना सदर जमीन BDL उद्योग उभारण्यास न देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच शासन उद्योग विभागामार्फत दुसरा मोठा उद्योग उभारणीसाठी प्रयत्न करणार आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१६-०३-२०२६) :** (१) अंशत खरे आहे.

अतिरीक्त अमरावती नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र. बी-१ क्षेत्र - २२,४१,३५५५.०० चौ.मी. (५५३.८५ एकर) (२२४.१३ हे) हा मेसर्स भारत डायनामिक्स लि. यांना मिसाईल मॅनिफॅक्चरींग युनिट या

प्रयोजनाकरीता देशाच्या सुरक्षेच्या संबंधी क्षेपणास्त्रांच्या उत्पादनांची निर्मिती करण्याच्या दृष्टीने दिनांक १५.११.२०११ रोजी वाटप करण्यात आलेला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३), (४) व (५) सदर कंपनीस दिनांक ०१.०१.२०२१ रोजी प्रथम कारणेदाखवा तसेच दिनांक ०५.०४.२०२२ रोजी द्वितीय कारणेदाखवा नोटिस निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर कंपनीस पुनश्च दिनांक १४.०८.२०२५ रोजी कारणेदाखवा नोटिस निर्गमित करण्यात आलेली असून दिनांक २०.११.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या नोटिसच्या अनुषंगाने पंचनामा करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथे महाराष्ट्रातील एकमेव पीएम मित्र टेक्सटाईल (PM MITRA) पार्क ची निर्मिती करणेबाबत**

**(७) १३३७१ (१९-०९-२०२५). श्री.राजेश वानखडे (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथे महाराष्ट्रातील एकमेव पीएम मित्र (PM MITRA) टेक्सटाईल पार्क ची निर्मिती करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर टेक्सटाइल पार्कमधील जमिनीचे दर रु.१४०० प्रति चौ.मी. इतका उद्योजकांसाठी असून हा दर अन्यत्र टेक्सटाइल उद्योगांकरिता असलेल्या दरापेक्षा दुप्पट आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, यामुळे येथे नवीन उद्योजक येण्यासाठी उत्सुक नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर टेक्सटाईल पार्क मध्ये गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता धोरणात्मक निर्णय घेऊन येथील जमनिची दर कमी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
दिनांक १७/०३/२०२३ रोजी भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयातर्फे ब्राऊन फील्ड श्रेणी अंतर्गत ७ पी.एम. मित्र वस्त्रोद्योग उद्यानांचे वाटप जाहीर केले आहे त्यामध्ये महाराष्ट्रातील एकमेव अमरावती हा टेक्सटाईल पार्क आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दिनांक ०३/०४/२०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार सदर प्रकल्पातील औदयोगिक भूखंडाचे दर प्रथम वर्षाकरीता दिनांक ३०/०६/२०२६ पर्यत रु. ५९०/- प्रति चौरस मीटर व तद्नंतर रु. १२२१/- प्रति चौरस मीटर ठेवण्यात आले आहेत. पीएम मित्रा (PM MITRA) टेक्सटाईल पार्क करिता

१) M/s Sanathan polycot Pvt Ltd
२) M/s Polmann India Ltd
३) M/s Pratap Industries
४) M/s Shree Siddhivinayak
५) M/s Insha Cotex pvt Ltd

या कंपन्यासोबत सामजस्य करार झालेला आहे. तसेच M/s Infinited Fiber व M/s Re & UP या

कंपन्यासोबत पीएम मित्रा (PM MITRA) टेक्सटाईल पार्क मध्ये गुंतवणूक करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कायर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ब्रिटिश कालीन बंधारा दुरुस्ती व खोलीकरणाची कामे करणेबाबत**

**(८) १३३७९ (१९-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कायर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील ब्रिटिश कालीन बंधारा दुरुस्ती व खोलीकरणाचे करण्याचे काम करण्याची मागणी संबंधित ग्रामपंचायतीकडून उपविभागीय अधिकारी, वणी तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती वणी यांचेकडे दिनांक ०५ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१०-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे कायर, ता. वणी येथील ब्रिटीशकालीन बंधारा दुरुस्ती व खोलीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रक तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेसाठी क्षेत्रिय स्तरावर कार्यवाही सुरु असून शासनास प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य कामगार विमा रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू करुन रिक्त पदे तातडीने भरून अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान व सेवा सुविधा उपलब्ध करणेबाबत**

**(९) १३४४९ (२३-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी मुंबई- पुणे- कोल्हापूरसह राज्यात बारा कामगार विमा रुग्णालय कार्यरत असून आरोग्य दिनाच्या निमित्त साधून सर्व कामगार विमा रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बारा कामगार विमा रुग्णालयातील सहा रुग्णालयातील आयसीयू मागील तीन वर्षात बंद असून बाह्य रुग्ण विभाग व आंतर रुग्ण विभागातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, लिपिक संवर्ग, पॅरामॅडिकल ते चतुर्थश्रेणी पदांवरील कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्याने कामगार व त्यांच्या परिवारातील नातेवाईकांना वैद्यकीय औषधोपचार मिळण्यात गैरसायीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, कामगार विमा रुग्णालयात अत्याधुनिक उपचार सेवा नसल्याने अनेक कामगार व त्यांच्या नातेवाईकांना रेफर टू अदर हॉस्पिटल अंतर्गत बाहेरील खाजगी रुग्णालयात औषध उपचार करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उशिरा येणे व गैरहजर असल्याने रुग्णांना व कामगारांना वैद्यकीय सेवा देण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू करुन रिक्त पदे तातडीने भरून अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान व सेवा सुविधा उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (०९-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.

आरोग्य दिनाच्या निमित्त दिनांक ०७.०४.२०२५ पासून राज्यातील सर्व १२ कामगार विमा रुग्णालयांमध्ये विमा रूग्णांव्यतिरिक्त सर्व सामान्य जनतेला महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत उपचार पुरविण्यात येत आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील ०८ राकावि रुग्णालयामध्ये ICU स्थापित करण्यात आले असून, त्याकरीता Intensivist व Resident Doctors यांची नियुक्ती करण्याची व आवश्यक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

राज्य कामगार विमा योजना रूग्णालयांमध्ये नियमित स्वरुपातील सरळ सेवेची व पदोन्नतीची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महा-राकावि सोसायटी मार्फत आवश्यक विशेषज्ञ, वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, समवैद्यकीय, लिपिक व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेली असुन, योजनेअंतर्गत लाभार्थींची गैरसोय होणार नाही व लाभार्थी वैद्यकीय सेवेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

ज्या क्षेत्रात राकावि रुग्णालय उपलब्ध नाही अशा क्षेत्रातील विमा रुग्णांना Secondary Medical Care करीता टाय-अप करण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयांमार्फत उपचार पुरविण्यात येत असून अपवादात्मक परिस्थितीत एखादी सेवा राकावि रुग्णालयात उपलब्ध नसल्यास फक्त अशा सेवेकरीता Secondary Medical Care करीता खाजगी रुग्णालयात उपचार पुरविण्यात येतात. Super Speciality Treatment करीता राकावि महामंडळामार्फत टाय-अप करण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयांमार्फत उपचार पुरविण्यात येतात. सदर उपचारांवरील खर्च राकावि महामंडळामार्फत भागविण्यात येतो.
(४) सोसायटी स्थापित झाल्यानंतर मंजूर पदांव्यतिरिक्त राकावि महामंडळाच्या मानकानुसार अतिरिक्त विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यात येऊन ओपीडीचे दिवस व वेळेत सुद्धा वाढ करण्यात आली असून आता सर्व राकावियो रूग्णालयात सकाळी ९ ते दुपारी ४ पर्यंत आठवड्याचे सर्व कार्यरत दिवस ओपीडी सुरू ठेवण्यात येत आहेत. तसेच Psychiatry, Dermatology व Ayush ह्या ओपीडी सुद्धा सुरू करण्यात आल्या असुन, सदर ओपीडी वेळेवर सुरु करण्याबाबतचे निर्देश आयुक्तांनी सर्व संबंधितांना दिलेले आहेत.

ओपीडीमध्ये डॉक्टर उशीरा येत असल्यास त्यांना समज देण्यात येत असून त्यानंतरही सुधारणा न झाल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येते.
(५) आरोग्य दिनाच्या निमित्ताने दिनांक ०७/०४/२०२५ पासून राज्यातील सर्व राकावियो रुग्णालयांमध्ये विमा रूग्णांव्यतिरिक्त सर्व सामान्य जनतेला महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत उपचार पुरविण्यात येत आहेत.

सदर रुग्णालयाकरीता नियमित व कंत्राटी स्वरूपात मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच

सदर रुग्णालयाकरीता आवश्यक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करुन देण्यात आली असुन, मागणीनुसार इतर वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे. याव्यतिरिक्त सदर रूग्णालयामध्ये ICU स्थापित करण्यात आले असुन, त्याकरीता आवश्यक साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील जलसंधारण विभागांतर्गत केली जाणारी कामे शासनाकडून रद्द केल्याबाबत**

**(१०) १३५६९ (१९-०९-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जलसंधारण विभागांतर्गत सन २०२१ ते सन २०२४ या कालावधीतील मंजूर कामांपैकी अद्यापपर्यंत सुरू न झालेली तसेच अर्धवट असलेली कामे रद्द केली असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, जी कामे अपूर्ण स्थितीत आहेत ती आता रद्द केल्यास नुकसान होणार असल्याने या कामांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (०६-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) विभागातील प्रगतीपथावरील कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही सुरु न झालेली कामे ज्यावर कोणताही खर्च झालेला नाही अशी कामे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासनाने दिनांक ०५/०६/२०२५ च्या शासन निर्णयान्वये सदर कामे रद्द केलेली आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यात रेन वॉटर हार्वेस्टिंगची संकल्पना कागदावरच असल्याबाबत**

**(११) १३६९६ (३०-०७-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यात रेन वॉटर हार्वेस्टिंगची संकल्पना कागदावरच राहत असल्याने ऐन उन्हाळात पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यातील रेन वॉटर हार्वेस्टिंगची अंमलबजावणी तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२३-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) दक्षिण सोलापूर तालुक्यात पाझर तलाव, सिमेंट नाला व को.प.बंधारे अशा जलसंधारणाच्या १५८ योजना पुर्ण करण्यात आल्या असून त्यामार्फत १९२८ स.घ.मी. पाणीसाठा व ६७७.२० हे. क्षेत्र निर्माण झाले आहे. ५ पाझर तलाव पुनर्बांधणी व ४ सिमेंट नाला बंधाऱ्याची नवीन कामे प्रस्तावित केली असून, त्यामार्फत ७६८

स.घ.मी. पाणीसाठा व ११८ हे. सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेतर्गंत दक्षिण सोलापूर तालुक्यातील ४ जलसाठ्यातून १२.८९ लक्ष घन मीटर गाळ काढण्यात आला असून त्याद्वारे सुमारे १२.८९ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत दक्षिण सोलापूर तालुक्यामध्ये सन २०१५ नंतर बांधकाम केलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था मंद्रुप व ग्रामीण रुग्णालय, वळसंग येथे रेन हार्वेस्टिंगचे काम करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## होमीओपॅथीक वैद्यकीय अधिकाऱ्यांना गट-ब प्रवर्गामध्ये समावेशन करणेबाबत

**(१२) १३७६३ (१९-०९-२०२५). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक : बैठक-२८२३/प्र.क्र.४३०/आरोग्य-७, दिनांक १४ मार्च, २०२४ नुसार १० वर्ष वा त्यापेक्षा जास्त कालावधीपासुन कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारीत करुन रिक्त होणाऱ्या समकक्ष पदांवर सरळ सेवेने ७० टक्के व समावेशनाने ३० टक्क प्रमाणे भरती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नियुक्ती प्रक्रीयेमध्ये होमीओपॅथिक वैद्यकीय अधिकाऱ्यांचा वैद्यकीय अधिकारी गट-ब प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वैद्यकीय अधिकारी गट-ब प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आलेला नसल्याने होमीओपॅथिक वैद्यकीय अधिकाऱ्यांचे ३० टक्के प्रमाणे समावेशन करण्यास अडचणी निर्माण होवून त्यांचेवर अन्याय झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निर्देशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त होमीओपॅथिक वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय अधिकारी गट-ब प्रवर्गामध्ये समावेशन करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१३-०१-२०२६) :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील मंजूर समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम सुधारित करुन त्यामध्ये रिक्त होणा-या समकक्ष पदांवर सरळ सेवेने ७० टक्के व समावेशनाने ३० टक्के याप्रमाणे भरती करण्याबाबत सेवाप्रवेश नियमात सुधारणा करण्याबाबत दिनांक १४/०/२०२४ अन्वये शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. तथापि, सामान्य प्रशासन विभागाने सेवाप्रवेश नियमात समावेशनाने नियुक्तीचा मार्ग विहित करता येऊ शकत नाही." असे अभिप्राय दिले असल्याने, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा समायोजनाबाबत दिनांक १४/०३/२०२४ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करुन दिनांक ०४/११/२०२५ रोजी मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे सुधारीत शासन निर्णय दिनांक ०४/११/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयात दिनांक १४/०३/२०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानामधील १० वर्ष सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे समकक्ष पदावर सेवा समायोजन सार्वजनिक आरोग्य विभागातील पदांबरोबर ग्राम विकास विभागामार्फत भरण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेतील रिक्त पदांवर करण्यात येणार आहे.

(२), (३) व (४) सार्वजनिक आरोग्य विभागात BHMS (Homeopathic) या शैक्षणिक अर्हतेची पदे मंजूर नाहीत. तथापि, दिनांक ०४/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा नियमित पदांवरील समायोजनाकरीता निकष ठरविण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आंतर विभागीय समिती स्थापन करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे. प्रस्तुत विषय आंतर विभागीय समितीसमोर ठेवून समितीच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणेसह राज्यातील येथील बाल न्याय मंडळातील सदस्यांच्या नियुक्ती बाबत

**(१३) १३७९५ (०८-०९-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील बाल न्याय मंडळ (जेजेबी) मधील सदस्यांच्या नियुक्त्या सुमारे दहा महिन्यांपासून प्रलंबित असल्यामुळे सहा हजारहून अधिक प्रकरणे निकालाच्या प्रतिक्षेत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंडळातील सदस्यांच्या नवीन नियुक्त्या करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत व त्यास कोण जबाबदार आहे,
(३) असल्यास, सदर नियुक्त्या शासन केंव्हा पूर्ण करणार आहे,
(४) तसेच,राज्यातील इतर जिल्ह्यातील बाल न्याय मंडळातील सदस्यांच्या रिक्त जागा शासन केंव्हा भरणार आहे,
(५) तसेच, राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यात सदस्यांच्या जागा रिक्त आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०१-०१-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
बाल न्याय मंडळ पुणे-१ वर नियुक्त सदस्यांनी आपल्या पदाचा गैरवापर केल्याने त्याबाबत चौकशी करून शासन अधिसुचना दिनांक ०८/१०/२०२४ अन्वये त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात आली आहे. सदर बाल न्यायमंडळावरील २ रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सातारा व अहिल्यानगर येथील सदस्य यांना देण्यात आला आहे. तसेच सदर बाल न्यायमंडळाचा ३ वर्षाचा कार्यकाळ दिनांक ०१/०५/२०२५ रोजी संपुष्टात आल्याने सदर बाल न्याय मंडळांचे कामकाज सुरळीत चालणेकरीता दिनांक ०८/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर बाल न्याय मंडळावरील सदस्यांना नवीन सदस्यांची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(२) राज्यातील बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करणेकरीता बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम व नियमामधील कलम ९० नुसार राज्य निवड समिती गठीत करण्यात येते. सदर निवड समितीचे अध्यक्ष मा.उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश यांची शिफारस संबधित मा.उच्च न्यायालयाचे प्रबंधक यांचे मार्फत करण्यात येते. तसेच, सदर समितीवर नियुक्त करावयाचे सदस्य यांची नियुक्ती जाहिरात प्रक्रीया राबवून मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेवून शासनामार्फत करण्यात येते. सदर निवड समिती सदस्यांची नियुक्तीबाबत विधानमंडळाची निवडणूक २०२४, निवडणूक आचारसंहिता यामुळे विलंब झालेला आहे. तसेच, सदर निवड समिती दिनांक ०८/०५/२०२५ शासन अधिसुचनेन्वये गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार, बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समितीवर नियुक्त करावयच्या अशासकीय सदस्यांची नियुक्ती प्रक्रीया करण्याच्या अनुषंगाने सदर निवड समिती मार्फत मुलाखत घेवून पात्र उमेदवारांची शिफारस शासनास करण्यात येते व त्यानंतर उचित स्तरावर मान्यता घेवून बाल न्याय मंडळावरील सदस्यांची नियुक्ती शासनामार्फत शासन अधिसुचनेन्वये करण्यात येते. सबब, सदर प्रसंगी कोणासही जबाबदार धरण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) राज्य निवड समितीमार्फत नवीन बाल न्याय मंडळावर सदस्यांची नियुक्तीच्या अनुषंगाने मुलाखत कार्यक्रम

चालू असून बाल न्याय मंडळ, पुणे बाबत पात्र उमेदवारांची निवड समितीमार्फत शासनास शिफारस प्राप्त होताच विभागामार्फत सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) राज्य निवड समितीमार्फत राज्यातील ३६ जिल्ह्यांपैकी २३ जिल्ह्यांतील सदस्यांच्या मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर राज्य निवड समितीमार्फत प्राप्त शिफारशीनंतर राज्यातील इतर बाल न्याय मंडळावरील रिक्त जागा भरणेबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल.
(५) राज्यातील बाल न्याय मंडळावरील सदस्यांच्या जिल्हानिहाय रिक्त जागांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|
| १. | अमरावती | १ |
| २ . | कोल्हापूर | १ |
| ३ . | गडचिरोली | २ |
| ४. | नागपूर | १ |
| ५ . | सिंधूदुर्ग | १ |
| ६ . | रत्नागिरी | १ |
| ७ . | मुंबई उपनगर | १ |
| ८. | अकोला | १ |
| ९. | वाशिम | १ |
| १० . | पुणे | २ |

उपरोक्त तक्त्यातील पुणे येथील बाल न्याय मंडळावरील २ रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार सातारा व अहिल्यानगर येथील सदस्य यांना देण्यात आला आहे. तसेच मुंबईउपनगर येथील रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई शहर येथील सदस्याकडे देण्यात आला आहे.

---

## नीरा शिवतक्रार (ता. पुरंदर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीचे नगर पंचायत मध्ये रुपांतर करण्याबाबत

**(१४) १३९०४ (२९-०९-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नीरा शिवतक्रार (ता. पुरंदर, जि.पुणे) येथील ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रुपांतर करण्याची बाब प्रस्तावित आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत ग्रामविकास विभागाकडून आदेश होऊनही जिल्हा परिषद व ग्रामपंचायत तातडीने कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच सदर ग्रामपंचायतीचे नगरपंचायत मध्ये रूपांतर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०३-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
नीरा शिवतक्रार ग्रामपंचायतीने दिनांक ०९/०६/२०२५ रोजी विशेष ग्रामसभा घेऊन ठराव क्र.०१ अन्वये

ग्रामपंचायतीचे नगर पंचायत/ नगर परिषद मध्ये रूपांतर करण्यास नकार दिला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयात असलेली रिक्त पदे भरणेबाबत**

**(१५) १४००० (०८-०९-२०२५). श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील वसंतदादा शासकीय रुग्णालयात अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०७-१०-२०२५) : (**१) व (२) सांगली वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयात एकुण ७३९ इतक्या मंजूर पदांपैकी ५१९ भरलेली आहेत व २२० पदे रिक्त आहेत.

सदर रुग्णालयामधील रिक्त पदांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | **पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय** | | |
|---|---|---|---|
| **पदनाम** | **मंजूर** | **भरलेली** | **रिक्त** |
| अध्यापक संवर्ग (वर्ग-१ व वर्ग-२) | २४ | १४ | ७ |
| वर्ग-३ (तांत्रिक व अतांत्रिक) | ७९ | ४१ | ३८ |
| वर्ग – ३ (परिचर्या संवर्ग) | ३९९ | ३५६ | ४३ |
| वर्ग - ४ | २३७ | १०५ | १३२ |
| **एकूण** | **७३९** | **५१९** | **२२०** |

(३) सद्य:स्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिनस्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने आयोगाने प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे नियमीत भरेपर्यत ३६४ दिवसांकरीता करार तत्वावर अध्यापकांची नियुक्ती संचालनालय स्तरावरुन करण्यात येते. वर्ग-३ ची तांत्रिक व पदे स्पर्धा परीक्षा-२०२५ व्दारे टीसीएस मार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे, तसेच उर्वरीत पदे पदोन्नतीने भरण्यात येतात. कनिष्ठ लिपिकांची सरळसेवेतील रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर करण्यात आले आहे. त्यापैकी ४७७ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. उच्चश्रेणी व निम्नश्रेणी लघुलेखकांची रिक्त पदे विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवापूर (जि.नागपूर) तालुक्यातील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१६) १४०९७ (०८-०९-२०२५). श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवापूर (जि. नागपूर) तालुक्यातील गाव - खेडयांना मुख्यमार्गापासून जोडणाऱ्या अनेक पोहच रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उमरेड-वरोरा या राष्ट्रीय महामागाला जोडणाऱ्या मालेवाडा व उखळी या दोन्ही गावांतील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, मालेवाडा रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे येथे येणारी राज्य परिवहन मंडळाची बस बंद झाली असल्याने विद्यार्थी, वृध्द, महिला यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२५-०२-२०२६) :** (१), (२), (३) व (४) भिवापूर तालूक्यातील उखळी व मालेवाडा या दोन गावांना उमरेड-वरोरा या राष्ट्रीय महामार्गाला जोडण्यासाठी उखळी जोडरस्ता (ग्रामा-७४) व कारगाव रेल्वे स्टेशन ते कारगाव मांडवा मालेवाडा मार्ग (इजिमा-२७५) हे पोहोच रस्ते उपलब्ध आहेत. सदर दोन्ही रस्त्यांच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेंतर्गत प्रत्येकी रु.१०.०० लक्ष निधी मंजूर असून सदर कामे प्रगतीत आहेत.

या व्यतिरिक्त सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ग्रामा-७४ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.३०.०० लक्ष रक्कमेचे व इजिमा-२७५ या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी रु.५०.०० लक्ष रक्कमेचे काम मंजूर असून सदर कामे निविदा प्रक्रियेत आहे.

मालेवाडा गावात जाणारा रस्ता दुरुस्त झाल्यानंतर तात्पुरती बंद करण्यात आलेली बससेवा पूर्ववत सुरु करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## व्यवसायोपचार शास्त्र (Occupational Therapy) विभागातील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती) चा लाभ, आणि पदव्युत्तर भत्ता देणेबाबत

**(१७) १४२६२ (०८-०९-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्यानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, व आयुर्वेद महाविद्यालय, आणि भौतिकोपचार व व्यवसायोपचार संस्थांमधील अध्यापकांना व समकक्ष पदांना दिनांक ०१ जानेवारी, २००६ पासून ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार व दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन श्रेणी लागू झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथील व्यवसायोपचार शास्त्र (Occupational Therapy), भौतिकोप्चार शास्त्र विभागातील सहाय्यक व सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित राहू नये म्हणून त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती)चा लाभ, व त्या सर्व अध्यापकांना पदव्युत्तर भत्ता देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयातील भौतिकोपचार विभागातील अध्यापकांस FGR /२०/२०२३ प्रमाणे करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती) चा लाभ देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या Law and Judiciary department Circular no ६८१-२०१६/Misc /E dtd २०/०२/२०१७ नुसार समकक्ष असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयातील व्यवसायोपचार शास्त्र (Occupational Therapy) विभागातील अध्यापकांना सुद्धा त्याचा लाभ देणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्य शासनाच्या आधारावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयातील व्यवसायोपचार शास्त्र (Occupational Therapy) विभागातील अध्यापकांना ६ व्या व नंतर ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार , सहाय्यक व सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित राहू नये म्हणून त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती) चा लाभ, व त्या सर्व अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता आणि पदव्युत्तर भत्ता देण्यात येत आहे काय?
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०३-२०२६) :** (१)हे खरे आहे.
(२) शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आल्यानंतर दिनांक १२/०४/२०२२ च्या शासन निर्णयान्वये करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम व पदव्युत्तर भत्ता लागू करण्यात आलेला आहे.
(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालीका परिपत्रक दिनांक १२/१२/२०२३ अन्वये फक्त भौतिकोपचारशास्त्र विभागातील अध्यापकांना करिअर ऍडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबध्द दर्जा पदोन्नती) चा लाभ अनुज्ञेय केलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयातील व्यवसायोपचारशास्त्र (Occupational Therapy) विभागातील अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता आणि पदव्युत्तर भत्ता अनुज्ञेय नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील शिक्षकांवर करण्यात आलेल्या निलंबनाबाबत

**(१८) १४२८५ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या २० शाळांतील ३५ शिक्षकांवर केवळ कमी पटसंख्या असल्याच्या कारणावरून निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय पटसंख्या घटण्यामागील धोरणात्मक, सामाजिक व स्थानिक कारणांचा विचार न करता शिक्षकांवर थेट निलंबनाची कारवाई करणे कितपत न्याय व वैधानिक आहे,
(३) असल्यास, सदर निलंबन आदेश मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली असून राज्यभरातील अशा इतर कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील शिक्षकांवरही अशाच प्रकारची कार्यवाही करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गेल्या पाच वर्षांत राज्यातील किती जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय पटसंख्या १० पेक्षा कमी झाली आहेत व यावर शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२९-०१-२०२६) :** (१) १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या २० शाळेवरील एकूण ३० सहायक अध्यापक यांना पंचायत समिती स्तरावरुन माहे जून, २०२५ मध्ये निलंबित करण्यात आले होते.

(२) सदर २० शाळेवरील सहायक अध्यापक यांनी विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे, गुणवत्ता वाढविणे याबाबत कुठल्याच प्रकारची कार्यवाही/प्रयत्न न केल्याचे दिसून आल्याने संबंधित शिक्षक हे पटसंख्या कमी होण्यासाठी प्रथमदर्शनी जबाबदार असल्याचे मत झाल्यामुळे त्यांनी कर्तव्यामध्ये कसूर केल्याचे कारणावरुन त्यांना निलंबित करण्यात आले होते.

(३) विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये या दृष्टीकोनातून या शिक्षकांना चौकशीच्या अधिन राहून जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या दिनांक २९/७/२०२५ रोजीच्या आदेशान्वये रिक्त पदावर पुर्नस्थापना देण्यात आली आहे.

(४) राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शालेय पटसंख्या १० पेक्षा कमी असलेल्या शाळांची अंदाजे संख्या ६४८२ इतकी आहे.

सदरची पटसंख्या वाढविण्यासाठी दिशा उपक्रम, निपुण भारत अभियान, शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, उपस्थिती भत्ता देणे, विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे, शिष्यवृत्ती व इ. सारखे विविध उपक्रम राबविणे, तसेच पालक संपर्क, शाळा गुणवत्तापूर्ण करणे, भौतिक सुविधा पुरविणे, इमारत नसलेल्या शाळांना नविन शालेय इमारती बांधकाम करुन देणे, विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह उपलब्ध करुन देणे, बोलक्या भिंती तयार करुन देणे, गुढीपाडवा पट वाढवा यांसारखे उपक्रम, पालक मेळावे, गृहभेटी, स्थानिक स्तरावर जनजागृती करणे, विविध नाविण्यपूर्ण कार्यक्रम राबविणे, शाळांना खेळाचे साहित्य, संगणक संच, ग्रंथालयीन पुस्तके उपलब्ध करुन देणे, पटसंख्या वाढवा बक्षीस मिळवा यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करून कामाचे तास वाढविल्याबाबत

**(१९) १५५५६ (१४-११-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सरकार कारखाना कायदा, १९४८ मध्ये सुधारणा करून कामाचे तास दररोज १२ तासांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याबाबत कामगार संघटना आणि भागधारकांचा सल्ला घेण्यात आला होता काय,

(३) असल्यास, कामाचे तास १२ तासापर्यंत वाढविण्याची कारणे काय आहेत आणि त्याचे अपेक्षित फायदे व तोटे काय आहेत,

(४) असल्यास, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि कामाच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत,

(५) तसेच, कामगारांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामाचे मूल्यांकन शासनाने केले आहे काय, असल्यास, अशा मूल्यांकनाचे तपशील काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०६-०४-२०२६) :**(१), (२), (३), (४) व (५) Deregulation आणि Compliance Burden या क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करण्यासाठी केंद्रीय सचिवालयाने स्थापन केलेल्या Deregulation Cell राज्यांसाठी कृतीदले स्थापन केलेली होती. यापैकीच महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांसाठी स्थापन केलेल्या

कृतीदलाने कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा सुचवलेल्या होत्या. या सुधारणांच्या अनुषंगाने दिनांक ०३/०९/२०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाचे तास १२ तासापर्यंत करण्यास मान्यता देण्यात आली होती.

तथापि, आठवड्यातील कामाची मर्यादा पूर्वीप्रमाणेच ४८ इतकी ठेवण्यात आली होती. कायदेशीर अतिकालिक कामाची मर्यादा वाढवून कामगारांना अनौपचारिकपणे किंवा योग्य मोबदल्याशिवाय अतिरिक्त तास काम करण्यास सांगितले जाण्यापासून संरक्षण मिळणार होते. आठवड्याच्या कामाच्या कमाल ४८ तासांच्या मर्यादेमुळे कामगारांचे अधिकारदेखील अबाधित राहणार होते. तसेच अतिकालिक कामासाठी कामगाराची लेखी संमती घ्यावी अशी तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे या सुधारणांमुळे कामगारांच्या शारिरीक व मानसिक आरोग्यावर परिणाम होणार नव्हता.

उपरोक्त सुधारणाच्या अनुषंगाने कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा करणेबाबतचा अध्यादेश राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. तथापि, दरम्यानच्या काळात दिनांक २१/११/२०२६ रोजी केंद्र शासनाने कामगार संहिता लागू केल्या. यामधील व्यवसायिक सुरक्षा व आरोग्य आणि कामाची स्थिती संहिता, २०२० मध्ये कारखान्यातील दैनंदिन कामाची मर्यादा ८ तास आहे.

यास अनुसरून राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविलेला कारखाने अधिनियम,१९४८ मध्ये सुधारणा करणेबाबतचा अध्यादेश मागे घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहर व परिसरात वातावरणातील बदलामुळे वाढलेला इन्फ्लुएंझा (Influenza) आजाराचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(२०) १५५६१ (१९-११-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व परिसरात वातावरणातील बदलामुळे इन्फ्लुएंझा आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळून येत असल्याचे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या आजारामुळे शासकीय दवाखाने व खासगी रुग्णालयांमध्ये बाहय रुग्ण विभागात (ओ.पी.डी.) रुग्णांची वाढ झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्याअनुषंगाने नागरीकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी तातडीची उपाययोजना, जनजागृती मोहीम, औषधोपचार व्यवस्था , आरोग्य सुविधा उपलब्ध करणेसह सदर आजाराचा प्रसार रोखण्याबात शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

इन्फ्लुएंझा (स्वाईन फ्लू) हा आजार थेट वातावरणातील बदलामुळे होत नाही. तो मुख्यत: इन्फ्लुएंझा विषाणूमुळे होतो. पुणे शहर व परिसरातील रुग्णसंख्येचा तपशील खालीलप्रमाणे :-

| माहे | पुणे म.न.पा. | पिंपरी-चिंचवड म.न.पा. | पुणे ग्रामीण | एकूण पुणे जिल्हा |
|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०२५ | २० | ० | ० | २० |
| जाने. ते ऑगस्ट २०२५ | १२४ | ० | ० | १२४ |

(२) हे खरे नाही.

पावसाळा व हवेतील आर्द्रता, थंड हवामान यामुळे ऑगस्ट महिन्यामध्ये सर्दी, ताप व खोकल्याच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याने ओ.पी.डी. रुग्ण संख्येमध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास येते. परंतु, इन्फ्लुएंझा या आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर आजाराच्या अनुषंगाने पुणे म.न.पा., पिंपरी-चिंचवड म.न.पा. तसेच, पुणे ग्रामीणसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये नियमित उपाययोजना राबविण्यात येतात. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मार्फत आरोग्य शिक्षण दिले जाते. यामध्ये प्रामुख्याने वारंवार साबणाने हात धुणे किंवा सॅनिटायझरचा वापर करणे, खोकताना/शिंकताना रुमाल किंवा कोपराने तोंड झाकणे, गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे, आजारी व्यक्तीपासून थोडे अंतर ठेवणे, डोळे, नाक, तोंड यांना अनावश्यक स्पर्श टाळणे इ. बाबींचा अंतर्भाव आहे. तसेच, उपचारात्मक व प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विदर्भासह राज्यातील लघु उद्योगांना बळकटी देणेबाबत

**(२१) १५७०४ (२७-०१-२०२६). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भासह राज्यातील अनेक लघु उद्योजकांना माल विक्रीनंतर वेळेत देयके न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून परिणामी त्यांच्या उत्पादन प्रक्रियेवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिस्थितीमुळे संबंधित उद्योजकांमध्ये नाराजीचे वातावरण असून त्यांनी शासनाकडे सहकार्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन लघु उद्योगांना वेळेत देयके देणेबाबत व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सुक्ष्म, लघु, मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ अन्वये विभागस्तरावर सुक्ष्म व लघू उपक्रम सुकरता परिषद स्थापन करण्यात आलेल्या आहे. सदर सुकरता परिषदांकडे पुरवठादार सूक्ष्म व लघु उद्योजकांकडून (तक्रारदार) लघु उद्योजकांना माल विक्रीनंतर वेळेत देयके प्राप्त होत नसल्याबाबत अर्ज प्राप्त होत असतात.

(२) बाबतचे थेट निवेदन/पत्रव्यवहार उद्योग विभागास प्राप्त झालेले नाही.

(३) पुरवठादार सूक्ष्म व लघु उद्योजक यांच्या प्रलंबित देयकाबाबत, पुरवठादार व खरेदीदार यांच्यामध्ये समेट घडवून पुरवठादार उद्योजकांचे देयक लवकरात लवकर अदा करण्याबाबत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ अन्वये राज्यामध्ये प्रत्येक विभागासाठी अध्यक्ष, सदस्य आणि सदस्य सचिव यांचा समावेश असलेली सूक्ष्म व लघु उपक्रम सुकरता परिषद स्थापन करण्यात आलेली आहे.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ मधील तरतूदीनुसार खरेदीदाराने MSME युनिटकडून वस्तू किंवा सेवा स्विकारल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत देयके अदा करणे

बंधनकारक आहे. खरेदीदार आणि विक्रेता यांच्यातील करारामध्ये यापेक्षा जास्त मुदत ठरवता येत नाही. परंतु ४५ दिवसांनंतरही देयके न दिल्यास, खरेदीदाराला प्रलंबीत रकमेवर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँक दराच्या तिप्पट दराने चक्रवाढ व्याज देणे अनिवार्य आहे. हे व्याज खरेदीदाराच्या आयकर गणनेमध्ये खर्च म्हणून दाखवता येत नाही, यामुळे खरेदीदारावर आर्थिक बोजा पडतो.

पुरवठादार सूक्ष्म व लघु उद्योजक (तक्रारदार) देयके मिळावीत याकरीता केंद्र शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या Online Dispute Resolution (ODR) for Delayed payments या प्रणालीव्दारे उक्त सुकरता परिषदांकडे आपले अर्ज दाखल करतात. सदर प्रणालीव्दारे प्राप्त प्रलंबित देयकाबाबत संबंधीत सुकरता परिषदेमार्फत सुनावणी घेऊन तात्काळ प्रकरण निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी उद्योग विभागामार्फत सामुहिक प्रोत्साहन योजना – २०१९, औद्योगिक समूह विकास योजना व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना या प्रमुख योजना राबविल्या जातात. सामुहिक प्रोत्साहन योजना – २०१९ अंतर्गत व्याज अनुदान, विद्युत शुल्क माफी, मुद्रांक शुल्क माफी, विद्युत कर अनुदान व कर सवलत दिली जाते. केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना (MSE-CDP) अंतर्गत सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी मंजूर प्रकल्प किंमतीच्या ६०% ते ८०% एवढे अनुदान केंद्र शासनाकडून तसेच १५% ते २०% एवढे अनुदान राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) अंतर्गत क्षमतावृध्दी कार्यक्रमाकरीता रुपये १०.०० लक्ष व सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी रुपये १०.०० कोटीच्या मर्यादेत मंजूर प्रकल्प किंमतीच्या ७०% ते ९०% अनुदान राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात येते. तसेच राज्यातील होतकरु युवक/युवतींसाठी स्वयंरोजगारास प्रोत्साहन देणारी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP) याअंतर्गत सेवा व कृषीपुरक उद्योगासाठी तसेच उत्पादन क्षेत्रातील उद्योगासाठी राज्य शासनाकडून प्रवर्ग निहाय प्रकल्प मंजूरीवर १५% ते ३५% अनुदान (मार्जिन मनी) देण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विशेषतः विदर्भाच्या औद्योगिक विकासासाठी सेझ धोरणास प्राधान्य देणेबाबत

**(२२) १५७२१ (२७-०१-२०२६). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः विदर्भाच्या औद्योगिक विकासाला चालना मिळण्यासाठी उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि भारताच्या आर्थिक विकास धोरणात सेझला अधिक प्रभावीपणे समाविष्ट करण्याची क्षमता असल्याने या सुधारणेस प्राधान्य देण्याची विनंती असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडी) यांनी शासनामार्फत केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विनंती केंद्र शासनाने मान्य केल्यास राज्यातील औद्योगिक उत्पादन वाढून स्पर्धात्मकता सुधारून सेझ युनिट्संना निर्यात आणि देशांतर्गत बाजारपेठेसाठी उत्पादन वाढविण्यास सक्षम केले जाईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन केंद्र शासनाने ही विनंती मान्य करावी याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

राज्य शासनामार्फत अशा प्रकारची कोणतीही विनंती केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना करण्यात आलेली नाही.

तथापि, असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडीसी) यांनी विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) अधिनियम व नियमांमध्ये प्रस्तावित दुरुस्त्यांची अंमलबजावणी वेगाने करण्यासाठी हस्तक्षेप करावा आणि सेझमध्ये निर्मित उत्पादने देशांतर्गत बाजारात विक्रीस परवानगी द्यावी व या विक्रीवर संपूर्ण तयार उत्पादनावर नव्हे तर वापरलेल्या (आयातित) कच्च्या मालावर "ड्युटी फोरगोन बेसिस" लागू करावा, अशी विनंती दिनांक २६.०७.२०२५ च्या पत्रान्वये केंद्रीय वाणिज्य मंत्री यांना केली आहे.

(२) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेण्याचे संपूर्ण अधिकार केंद्र शासनाकडे आहेत. असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट (एआयडीसी) यांनी केंद्र शासनास सादर केलेल्या विनंतीची वैधानिकता, उपयुक्तता तपासून मंजूरीबाबत निर्णय घेण्याबाबतची बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

(३) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) अधिनियम व नियमांची अंमलबजावणी ही पूर्णतः केंद्र शासनाच्या अखत्यारीतील बाब आहे. त्याबाबत राज्य शासनाकडून कोणताही धोरणात्मक निर्णय घेणे अभिप्रेत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करण्याचे**
**बंद असलेले संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत**

**(२३) १५७७६ (२७-०१-२०२६). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमाअंतर्गत उद्योग उभारण्यास शासनाकडून आर्थिक सहाय्य दिले जाते परंतु, सदर कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करण्यासाठीचे संकेतस्थळ माहे मार्च, २०२५ पासून बंद असल्याने अनेक अर्जदारांना उद्योग स्थापनेसाठी प्रस्ताव नोंदणी करता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव नोंदणी प्रक्रियेमध्ये निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्ताव सादर न झाल्याने महाराष्ट्रातील उद्योजकांना रोजगारनिर्मितीच्या संधीपासून वंचित राहावे लागते तसेच पंतप्रधान रोजगारनिर्मिती कार्यक्रमा अंतर्गत एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले व त्यापैकी किती मंजूर झाले त्याची जिल्हानिहाय चौकशी करुन संकेतस्थळ सुरळीत सुरू राहण्यासाठी केंद्र शासनाशी सातत्याने संपर्क साधून संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२४-०३-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयाकडून दिनांक १५/०८/२००८ पासून राबविण्यात येत असून खादी व ग्रामोद्योग आयोग ही संस्था नोडल एजन्सी म्हणून काम करत आहे. तसेच राज्य शासनाच्या जिल्हा उद्योग केंद्र आणि महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्यामार्फत सदर योजनेची राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०१६ पासून सदर योजनेची अंमलबजावणी संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाईन पोर्टलद्वारे करण्यात येत असून सदर संकेतस्थळ नियमित सुरू होते. तथापि, प्रलंबित अर्जांचा अनुशेष असल्याने नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक १५/०४/२०२५ पासून तात्पुरती स्थगित करण्यात आली होती.

(२) सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल

एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून सुरू केलेली आहे.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेंतर्गत दिनांक ०५/०३/२०२६ पर्यंत राज्यातून एकूण १४२८९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी २११५ अर्जांना बँकांकडून मंजुरी देण्यात आली आहे. सदरहू संकेतस्थळ तातडीने सुरू करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु, मध्यम मंत्रालयातंर्गत खादी व ग्रामोद्योग आयोग या नोडल एजन्सीकडे विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार नवीन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया दिनांक २३/०६/२०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई ,अंबरनाथ आणि चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयामधील निवासी डॉक्टरांच्या मागण्याबाबत तसेच त्यांचे मानधन वेळेवर मिळणेबाबत

**(२४) १५९२१ (२७-०१-२०२६). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, अंबरनाथ आणि चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयामधील वरिष्ठ डॉक्टरांचे माहे मे, २०२५ पासून मानधन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षापासून निवासी डॉक्टरांच्या संघटनेकडून प्रमुख मागण्या तात्काळ सोडविण्याकरिता सातत्याने आंदोलन, मोर्चा काढूनही त्याच्या मागण्या मान्य झालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वरिष्ठ निवासी डॉक्टरांचे वेतन प्रलंबित रहाण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार निवासी डॉक्टरांच्या मागण्याबाबत तसेच त्यांचे मानधन वेळेवर मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
सदर महाविद्यालयांतील निवासी डॉक्टर यांना माहे जानेवारी, २०२६ पर्यत विद्यावेतन देण्यात आले आहे.
(३) व (४) वरिष्ठ निवासी डॉक्टर यांचे विद्यावेतन प्रलंबित नाही.तथापि निवासी डॉक्टरांना वेळेवर विद्यावेतन अदा करण्याच्या अनुषंगाने विभागामार्फत दिनांक ०३/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये विहित कालमर्यादेत निधी वितरित करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली असून त्याबाबत आयुक्त व संचालक वैद्यकीय शिक्षण यांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात दर्जाचा लाभ मिळण्यासाठी तसेच "उत्कृष्ठता केंद्र" करणेबाबत

**(२५) १५९५५ (२७-०१-२०२६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याचा निर्णय दिनांक ०३ आक्टोबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान घेऊनही त्यास एक वर्ष उलटूनही, अद्याप मराठी भाषेला मिळणारे अभिजात दर्जाचे लाभ विषद करणारा शासन निर्णय जारी करणे, हे लाभ मिळण्यासाठी “उत्कृष्ठता केंद्र” स्थापन करण्याच्या प्रलंबित प्रश्नांसाठी

मंजूरी देणे, मराठी अभिजात भाषा समिती नेमणे इ, मागणी संदर्भात डॉ.श्रीपाद जोशी यांनी केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयाला सुमारे नऊ लेखी निवदने देवूनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभिजात दर्जाबाबत मराठी भाषा अभ्यासकांनी केलेल्या तक्रारीनुसार राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेल्या पाठपुरावाच्या अनुषंगाने मराठी भाषेच्या अभिजात दर्जा संबंधित मागण्या व शासन निर्णय जारी करणे व "उत्कृष्टता केंद्र" स्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) तसेच, याबाबत सदरहू कार्यवाही पूर्ण होण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२६) :** (१), (२) व (३) सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर ज्या भाषांना यापूर्वी अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे, त्यांच्याकडून पुढील कार्यवाहीसाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी विभागाच्या शिष्टमंडळाने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे भेट दिली असता त्यांनी म्हैसूर येथील केंद्रीय भारतीय भाषा संस्थेला (CIIL) भेट द्यावी असे सुचविले. यापूर्वी ज्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे त्यातील काही भाषांचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) हे केंद्रीय भारतीय भाषा संस्था, म्हैसूर येथेच कार्यरत आहेत.

अभिजात मराठी भाषेचे प्रकल्प कामकाज केंद्र शासनाच्या सहयोगाने पुढे न्यायचे असेल तर राज्याचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) असणे अनिवार्य आहे. त्यामुळे दिनांक १५/०९/२०२५ रोजी राज्यामध्ये अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) स्थापनेचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. दरम्यान विभागाच्या शिष्टमंडळाने शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे व्यक्तीशः भेट देऊन याबाबतचा पाठपुरावा केला. तद्नंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने उच्च शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांना दिनांक १६ जानेवारी, २०२६ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यात नोंदणीकृत डॉक्टरांविरोधातील तक्रारीबाबत क्युआर कोडप्रणालीची अंमलबजावणी योग्य प्रकारे करणेबाबत

**(२६) १६०६५ (२७-०१-२०२६). श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नोंदणीकृत डॉक्टरांविरोधातील निष्काळजीपणा व गैरपवृततीच्या आरोपांवर कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलने क्युआर कोडप्रणाली सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२ ते माहे ऑगस्ट,२०२५ या चार वर्षात एमएमसीकडे नोंदणीकृत डॉक्टराविरोधात दाखल झालेल्या एकूण तक्रारीपैकी किती तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, दाखल तक्रारी निकाली काढण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार क्युआर कोडप्रणालीची अंमलबजावणी योग्य प्रकारे न करण्याऱ्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-०३-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम, १९६७ मधील नियम ६२ ते ७४ च्या तरतूदीनुसार नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाच्या निष्काळजीपणा तथा गैरवर्तणूकी बाबत

तक्रारीची चौकशी करण्याचे परिषदेस प्रावधान आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषद कायदा, १९६५ मधील कलम २२ अन्वये त्यांना शिक्षा देण्याचे प्रावधान आहे. महाराष्ट्र राज्यात बोगस डॉक्टरांना आळा घालण्यासाठी आणि जनतेमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या दृष्टीने परिषदेमार्फत Know Your Doctor (KYD) कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे.

(२) सन २०२२ ते ऑगस्ट, २०२५ या चार वर्षात एमएमसीकडे नोंदणीकृत डॉक्टराविरोधात एकूण २७२ तक्रारी दाखल झालेल्या आहेत. त्यानुसार १९ प्रकरणामध्ये रितसर सुनावणी घेऊन तक्रारी निकाली काढल्या आहेत.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेतर्फे निश्चित कार्यपध्दती व अपुरे मनुष्यबळाअभावी विलंब लागत असे, परंतु यानंतर परिषदेकडे प्रलंबित असलेल्या विविध विषयांवर सखोल व परिणामकारक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने विषय तज्ञांचा एक विशेष गट गठीत करण्यात आला आहे.सदर विषयतज्ञ गटामार्फत दाखल तक्रारींची तांत्रिक, कायदेशीर व वैद्यकीय बाबींच्या अनुषंगाने सविस्तर तपासणी करून आवश्यक ते अभिप्राय व शिफारसी सादर करण्यात येत आहेत. त्यामुळे तक्रारींच्या सुनावणी व निकाली काढण्याच्या प्रक्रियेस वेग प्राप्त झाला असून प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यामध्ये प्रगती होत आहे.या उपाययोजनांमुळे परिषदेकडील कार्यपद्धती अधिक कार्यक्षम, पारदर्शक व कालबद्ध करण्यात आली असून तक्रारींचा निपटारा नियोजित वेळेत करण्यास मदत होत आहे.

(४) शासनाने दिनांक ०७/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये Know Your Doctor (KYD) उपक्रम सक्तीने राबविण्याबाबत परिषदेच्या स्तरावर आवश्यक निर्णय घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार Know Your Doctor उपक्रमाच्या प्रभावी मानक अंमलबजावणीसाठी कार्यप्रणाली (Standard Operating Procedure - SOP) तयार करण्याचे काम सध्या परिषदेच्या स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यास नवीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मंजूर करणेबाबत

**(२७) १६५६६ (२७-०१-२०२६). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला (जि.सोलापूर) तालुका हा प्रामुख्याने शेतीप्रधान असून तेथील अर्थव्यवस्था बहुतांशी शेतीवर अवलंबून आहे परंतु कमी आणि अनिश्चित पावसामुळे सदर भागात रब्बी पिकांवरच अधिक भर दिला जातो त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी मर्यादित असून अनेकांना रोजगारासाठी स्थलांतर करावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना देण्यासाठी तेथे नवीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) स्थापन करणे गरजेचे असून एमआयडीसीच्या स्थापनेमुळे अनेक स्थानिक तरुणांना उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास स्थलांतर कमी होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी स्थापन केल्याने औद्योगिक वसाहतीमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना तसेच कर संकलनात वाढ होऊन रस्ते पाणीपुरवठा वीज यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास होईल व अन्नप्रक्रिया उद्योग, कोल्ड स्टोरेज आणि शेतीशी संबंधित इतर उद्योगांना देखील प्रोत्साहन मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (११-०५-२०२६) :** (१) व (२) सांगोला तालुक्यामध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र नाही. तथापि, सहकारी औद्योगिक वसाहत कार्यरत आहे.

(३) व (४) सांगोला तालुक्यातील मौजे एकतपूर, मंगेवाडी व मौजे चिंचोली, (जि.सोलापूर) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याच्या अनुषंगाने जागेची दिनांक ०३/१०/२०२५ रोजी पाहणी करण्यात आलेली आहे.

सदर क्षेत्राच्या भूसंपादनाच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे मिळणेकरीता तहसिलदार,सांगोला, उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा, विभाग मंगळवेढा, अधिक्षक अभियंता,प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर व उप वनसंरक्षक, वनविभाग, सोलापूर या विभागांचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राकरीता आवश्यक ती कागदपत्रे तसेच वरील संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त होताच म.औद्यवि. अधिनियम,१९६१ मधील तरतुदी व मऔवि महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील घरेलू कामगारांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळणे तसेच मंडळाचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण करणेबाबत

**(२८) १६६९२ (२७-०१-२०२६). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरेलू कामगार कल्याण मंडळाचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण आणि राष्ट्रीय स्तरावरील सर्वसमावेशक कायद्यासाठी धोरणात्मक शिफारसी सादर करण्याबाबत युवा (YUVA) आणि संलग्न स्वयंसेवी संस्थांच्या निवेदनानुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान दिलेल्या निवेदनाद्वारे शासनाकडे महाराष्ट्र राज्य घरेलू कामगार कल्याण मंडळाचे (Maharashtra State Domestic Workers Welfare Board) तात्काळ पुनरुज्जीवन व बळकटीकरण करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या आंतरमंत्रालयीन समितीपुढे राष्ट्रीय स्तरावरील सर्वसमावेशक कामगार कायद्यासंदर्भात महाराष्ट्राचा व्यापक अनुभव व महत्त्वपूर्ण सूचना मांडण्यासाठी, युवा (YUVA) च्या प्रतिनिधींना सहभागी करून घेणेबाबत शासनाने केंद्रशासनाकडे शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील घरेलू कामगारांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षा मिळावी तसेच सदर मंडळाचे पुनरुज्जीवन व बळकटीकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१८-०२-२०२६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

(३) केंद्र शासनाने सामाजिक सुरक्षा २०२० (Social Security Code, २०२०) दिनांक २९/०९/२०२० रोजी अधिसूचित केली असून, दिनांक २१/११/२०२५ पासून या संहितेची अंमलबजावणी करण्याबाबत अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

त्यानुसार सामाजिक सुरक्षा संहिता २०२०, देशातील घरेलू कामगार व असंघटित कामगारांना लागू आहे. सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० नुसार घरेलू कामगार या असंघटित क्षेत्रातील कामगारांकरिता विविध सामाजिक तसेच कल्याणकारी योजना लागू करण्याकरीता कल्याणकारी मंडळ गठीत करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये, राज्याचे नियम प्रसिध्द करण्याची कार्यवाही शासनस्तरावर चालू

आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

## नागपूर शहरातील मेयो आणि मेडिकल रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(२९) १६६९९ (२७-०१-२०२६). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मेडिकल, तसेच मेयो या रुग्णालयात सद्यस्थितीत डॉक्टरांची / कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयांत २५० निवासी डॉक्टरांकरिता वसतीगृह उभारण्याचे कामही सद्य:स्थितीत प्रलंबित आहे, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयांत उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी या रुग्णालयांतील डॉक्टरांची / कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०३-२०२६) :** (१) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील डॉक्टरांच्या १५८ पदांपैकी १४७ पदे भरलेली आहेत. डॉक्टर्स व कर्मचा-यांची रिक्त पदे सरळसेवेने / पदोन्नतीने वेळोवेळी भरण्यात येतात.
(२) हे खरे नाही, वसतीगृहाचे ९५ % काम पूर्ण झाले असून फिनीशिंगचे काम सुरू आहे. लवकरच काम पूर्ण होऊन इमारतीचा ताबा मिळणे अपेक्षित आहे.
(३) सन २०२४ मध्ये गट- ड संवर्गातील ६४७ पदांची भरती करण्यात आली आहे. डॉक्टर्स व कर्मचा-यांची रिक्त पदे सरळसेवेने / पदोन्नतीने वेळोवेळी भरण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यात" मिशन शक्ती सामर्थ्य" या उपक्रमांतर्गत कामगार व नोकरदार महिलांना मुलांच्या संगोपनासाठी पाळणाघरे सुरु करणेबाबत

**(३०) १६७७७ (२७-०१-२०२६). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात " मिशन शक्ती सामर्थ्य " या उपक्रमातर्गत कामगार व नोकरदार महिलांना नोकरी दरम्यान त्यांच्या मुलांची काळजी घेता यावी या उद्देशाने सहा महिने ते सहा वर्षे वयोगटातील मुलांसाठी पाळणाघर योजना सुरू करण्यात आली असून राज्यात पहिल्या टप्प्यात एकूण ३४५ ठिकाणी ही पाळणाघरे सुरू करण्यास केंद्र शासनाने

मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप व अटी काय आहेत, तसेच आतापर्यंत कोणकोणत्या ठिकाणी किती पाळणाघरे सुरु करण्यात आली आहेत,
(३) असल्यास, या पाळणाघरांमध्ये डे-केअर सुविधा, पूर्वशालेय शिक्षण, पूरक पोषण आहार, वाढीचे निरीक्षण, आरोग्य तपासणी व लसीकरण यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पाळणाघरांमध्ये मुलांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता तपासण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा किंवा निरीक्षण प्रणाली स्थापन करण्यात येणार आहे हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) केंद्र शासनाच्या सूचनांप्रमाणे पाळणा (Anganwadi cum Creche) ही योजना ग्रामीण आणि शहरी भागातील कामगार महिलांना महिन्यातून किमान १५ दिवस किंवा वर्षातून सहा महिने काम मिळते व ज्यांच्या मुलांना घरी सांभाळण्यासाठी कोणी नाही अशा ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी सुरु करण्यात आली आहे. या पाळणामध्ये डेकेअर सुविधा, ३ वर्षाखालील बालकांसाठी पूर्व उद्दीपन (Stimulation) आणि ३ ते ६ वर्षाच्या बालकांसाठी पूर्व शालेय शिक्षण, पूरक पोषण आहार, वाढीचे निरीक्षण, संनियंत्रण व आरोग्य तपासणी आणि लसीकरण इत्यादी सुविधा समाविष्ट आहेत. यासंदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना शासन निर्णय दिनांक २१/८/२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर योजनेतंर्गत सद्यस्थितीत केंद्र शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार ३४५ पाळणा (Anganwadi cum Creche) सुरु करण्यास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ५२ पाळणा सुरू झालेले असून उर्वरित सुरु करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्रातून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करणेबाबत

**(३१) १७००४ (२८-०१-२०२६). श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.तुकाराम काते (चेंबूर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लंडनमधील महाराष्ट्र मंडळाच्या इमारतीला ९९ वर्षांच्या करार तत्त्वावर घेऊन, तेथे "छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्र" उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्र हे जगभरातील मराठी भाषिकांसाठी सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्याचे व्यासपीठ ठरणार आहे, तसेच या ठिकाणी मराठी भाषेच्या अभ्यासक्रमांची आखणी, प्रशिक्षण केंद्र, शिष्यवृत्ती योजना आणि कला, संस्कृती, पर्यटन, व्यापार व कौशल्य विकासासाठी निगडीत उपक्रम राबवले जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या केंद्रातून जगभरातील विद्यापीठांशी सहयोग साधून मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्दिष्ट आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर केंद्राच्या स्थापनेसाठी शासनामार्फत यंत्रणा स्थापन करुन कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे, महाराष्ट्र मंडळ, लंडन यांच्या ताब्यात असलेली ९९ वर्ष भाडे करारावरील वास्तू खरेदी करुन तेथे छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे.
(२) हे अंशत: खरे आहे, राज्य मराठी विकास संस्थेमार्फत आंतरराष्ट्रीय मराठी मंचाची स्थापना करण्यात आली असून १७ देशामध्ये समन्वयकांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर आंतरराष्ट्रीय मराठी मंचाचे मुख्यालय लंडन येथे महाराष्ट्र मंडळाकडील वास्तु/ इमारतीत करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर केंद्राची स्थापना करण्याची कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) गावाला "पुस्तकांचे गांव" म्हणून घोषित करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करणेबाबत

**(३२) १७०९१ (२७-०१-२०२६). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि. बीड) गावाला "पुस्तकांचे गाव" म्हणून घोषित करण्याची उदघोषणा मा.मंत्री, उद्योग, मराठी भाषा (महाराष्ट्र राज्य) यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई. यांची समन्वय अधिकारी म्हणून निवड करून शासकीय समिती तयार करण्यात आली आहे, परंतु सदर प्रकरणी अद्यापही शासन निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शहराला "पुस्तकांचे गाव" म्हणून घोषित केल्यानुसार त्वरित शासन निर्णय निर्गमित करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२६) :** (१) व (२) होय, ही बाब खरी आहे, याअनुषंगाने राज्यात पुस्तकांचे/कवितांचे गाव सुरु करण्याची योजना कार्यान्वित करण्याबाबत सर्वसाधारण सुचना दिनांक ३०/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(३) होय, ही बाब खरी आहे. सन्मानीय श्रीमती नमिता अक्षय मुंदडा, विधानसभा सदस्य (केज) यांनी निवेदनाव्दारे शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी केली होती.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कुष्ठरोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(३३) १७१२९ (२९-०१-२०२६). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), अ‍ॅड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२२ ते २०२५ या तीन वर्षांच्या कालावधीत कुष्ठरोग रुग्णांची संख्या वाढत असून माहे

एप्रिल, २०२५ महिन्यात १४,१७५ कुष्ठरोगांची नोंद करण्यांत आली असून कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने कुष्ठरोगाला सुचित करण्यायोग्य रोग (नोटीफायबल डिसीज) म्हणून घोषित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजारांचे मुलांमधील प्रमाण ३.४० टक्के इतके असून अनेक पातळयांवर प्रयत्न करुनही शून्य रुग्णसंख्येचे उद्दिष्ट अद्याप साध्य करण्यांत आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वैद्यकीय तज्ञ, सल्लागार, आजार निदान व उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची कमतरता यामुळे कुष्ठरोगाचे आव्हान कायम आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कुष्ठरोगाचे रुग्ण संख्या कमी करण्यासाठी येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. प्रकाश आबिटकर (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

राज्यात माहे एप्रिल, २०२५ अखेर १४,१७५ कुष्ठरुग्ण उपचाराखाली होते. कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक ३०/१०/२०२५ अन्वये कुष्ठरोग या आजाराला अधिसूचित आजार म्हणून घोषित केले आहे.
(२) हे खरे आहे.

१४ वर्षाखालील मुलांमधील कुष्ठरुग्णाचे प्रमाण ३.४० टक्के एवढे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राज्यात केंद्र व राज्य शासनामार्फत २०२७ पर्यंत शून्य प्रसाराचे ध्येय निर्धारीत केले असून त्यात विविध अभियान राबविण्यात येत आहेत.

१. कुष्ठरोग शोध अभियान (संपूर्ण लोकसंख्येचे सर्वेक्षण)

२. कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (जोखीमग्रस्त आश्रम शाळा व वसतिगृहातील विद्यार्थी, विटभट्टी कामगार, खाणकामगार, कारागृहातील व्यक्ती, विविध कारणांमुळे स्थलांतरित झालेल्या व्यक्ती व या व्यतिरिक्त नियमित तपासणीमध्ये वंचित राहिलेले घटक यांचे सर्वेक्षण)

३. स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान (३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी)

४. शून्य कुष्ठरुग्ण गावांचे सर्वेक्षण

५. अति जोखमीच्या गावांचे सर्वेक्षण

शासनामार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत:-

१. सन २०१६-१७ पासून सर्व जिल्हयांमध्ये निदानापासून वंचित राहिलेले रुग्ण शोधण्यासाठी कुष्ठरोग शोध मोहीम (LCDC) राबविण्यात येत आहे. या मोहिमेत आशा कार्यकर्ती व पुरुष स्वयंसेवक यांच्यामार्फत घरोघरी सर्वेक्षण करुन प्राथमिक स्थितीतील रुग्णांचे संशयित कुष्ठरुग्ण शोधले जातात. निदान निश्चिती झाल्यानंतर त्या रुग्णांना त्वरीत बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात येते.

२. कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र मोहीम दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कलावधीत राबविण्यात येत आहे. बहुतांशवेळा वरील सर्वेक्षणाच्या दरम्यान घरी हजर न राहणारा, कामासाठी सकाळी लवकर घर सोडणाऱ्या व विविध कारणांमुळे तपासणीपासून वंचित राहणाऱ्या लोकांसाठी ही मोहीम राबविण्यात येत आहे.

३. कुष्ठरोगाचे समूळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतर्गत रॅली, प्रश्नमंजुषा, महात्मा गांधीजी यांच्या पुण्यतिथी निमित्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान दिनांक ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत राबविण्यात येत आहे. याद्वारे प्रत्येक गावात कुष्ठरोगाबाबत व्यापक शास्त्रोक्त माहिती देणे व जनजागृती करण्यात येते.

४. शुन्य कुष्ठरुग्ण आढलेल्या गावांची संख्या २०,५६९ इतकी असून या गावांमध्येही नियमित सर्वेक्षण करण्यात येत आहे.

५. अति जोखमीच्या / जास्त रुग्ण भार असलेल्या गावात कुष्ठरोगविषयक जनजागृती करण्यात येते.

६. नवीन शोधलेल्या रुग्णांच्या सहवासितांमध्ये कुष्ठरोगाचा प्रसार होऊ नये म्हणून या सर्व सहवासितांना रिफांम्पीसीन या औषधीची एक मात्रा दिली जाते.

७. शाळेतील विद्यार्थ्यांना कुष्ठरोगविषयक आरोग्य शिक्षण दिले जाते.

८. नवीन शोधलेल्या कुष्ठरुग्णांपैकी विकृती रुग्ण व मुले कुष्ठरुग्ण आढळलेल्या ठिकाणी ग्रामीण भागात आशा व आरोग्य कर्मचारी यांच्यामार्फत संपूर्ण गावाचे सर्वेक्षण केले जाते व शहरी भागात अवैद्यकीय सहायक यांच्यामार्फत आजुबाजुच्या ३०० घरांचे सर्वेक्षण केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## असंघटीत सिनेकलाकारांसाठी कामगार विभागामार्फत काढलेल्या शासन निर्णयाचीअंमलबजावणी करणेबाबत

**(३४) १७३९७ (२७-०१-२०२६). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) असंघटीत सिनेकलाकारांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत शासनाने सन २०२३ मध्ये निर्णय घेतला असतानाही सदर शासन निर्णयाची कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याचे दिनांक १५ जुलै, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरम्यानच्या काळात त्याबाबत आझाद मैदान, मुंबई येथे उपोषणास बसणाऱ्या सिनेसृष्टी कलाकारांना माहे जुलै, २०२५ मध्ये मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी भेट देऊन चौकशी केली असता, उक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे त्यांचे निदर्शनास आणल्यावर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी त्याचवेळी आदेश दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांचे आदेश असूनही अद्याप कार्यवाही करण्यांत आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०२३ मध्ये काढलेल्या शासन निर्णयाची अद्याप अंमलबजावणी न होण्याची कारणे काय व दरम्यानच्या काळात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अॅड. आकाश फुंडकर (२४-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,

असंघटीत सिनेकलाकारांना आर्थिक व इतर सहाय करण्याबाबत शासनाने सन २०२३ मध्ये निर्णय घेतलेला नसून, शासनाने चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक/निर्माते यांची जबाबदारी आणि कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरीता मानक कार्यप्रणाली (SOP) दिनांक १४.०२.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार निर्गमित केलेली आहे.

सदर मानक कार्यप्रणालीची (SOP) संबंधित घटकांकडुन अंमलबजावणी होण्याकरीता चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक / निर्माते, दिग्दर्शक तसेच चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचारी / कामगार / कलाकारांचे नेतृत्व करणाऱ्या संघटना / फेडरेशन यांना आणि इतर सर्व संबंधितांना सदर

मानक कार्यप्रणालीची (SOP) प्रत पाठवून मानक कार्यप्रणालीची तंतोतंत काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

मा.मंत्री ( माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य), मुंबई यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन, सर्व संबंधितांना मानक कार्यप्रणालीची (SOP) अंमलबजावणी करण्यासाठी लेखी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही.

मा. मंत्री (कामगार) यांनी दिलेल्या निर्देशानुसार आणि मानक कार्यप्रमाणालीच्या (SOP) अंमलबजावणीबाबत प्राप्त ११५ तक्रारीच्या अनुषंगाने, क्षेत्रिय अधिका-यांनी सर्व संबंधितांची बैठक घेऊन ०७ तक्रारीमध्ये सिने कलाकार/कामगार यांना आर्थिक लाभापोटी रक्कम रु.७,१२,८२०/- देण्यात आलेली असून, क्षेत्रिय निरिक्षकांमार्फत ०२ आस्थापनांविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ व वेतन प्रदान अधिनियम, १९३६ च्या तरतुदीनुसार मा.अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी, अंधेरी, मुंबई यांचे न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

(४) शासनाने चित्रपट व इतर करमणुक क्षेत्रातील मालक/निर्माते यांची जबाबदारी आणि कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याकरीता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील चित्रीकरणासंदर्भात निर्माते/ सिनेकामगार/ कलाकार/ कामगार संघटना यांच्यातील वादविवाद, अडचणी, इत्यादीच्या तक्रारीकरीता महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, यांचेमार्फत मा.व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव (पूर्व), मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०३/२०२५ रोजीच्या आदेशान्वये "तक्रार निवारण समिती" तसेच मानक कार्यप्रणालीमध्ये (SOP) नमूद केलेल्या तरतूदीचे पालन चित्रपट व इतर करमणूक क्षेत्रातील मालक / निर्माते यांचेकडून होते की नाही आणि मानक कार्यप्रणालीनुसार (SOP) सिनेकलाकार/ कामगार यांना लाभ व न्याय मिळण्यासाठी तसेच मानक कार्यप्रणालीची (SOP) तंतोतंत अंमलबजावणी करण्याकरीता विविध विभागातील (कामगार विभाग, सांस्कृतिक विभाग व गृह विभाग) संबंधित अधिकारी यांची मा. कामगार आयुक्त यांचे अधिपत्याखाली दिनांक २२/०९/२०२५ रोजी 'संयुक्त समिती' गठित करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## हंगीरगे (ता.सांगोला, जि.सोलापूर) ग्रामपंचायत हद्दीमध्ये पंधराव्या वित्त आयोगातून व ग्रामपंचायत स्वनिधीतून केलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(३५) १७५१४ (२८-०१-२०२६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हंगीरगे (ता.सांगोला, जि.सोलापूर) ग्रामपंचायत हद्दीमध्ये सन २०२० ते २०२५ या कालावधीत पंधराव्या वित्त आयोगातून व ग्रामपंचायत स्वनिधीतून केलेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून सद्य:स्थितीत केलेली कामे अस्तित्वात नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामपंचायत स्वनिधीतून कोणकोणती कामे करण्यात आली व कामे केली नसल्यास, पंधराव्या वित्त आयोगाचा किती निधी शिल्लक आहे तसेच निधी अखर्चित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर कामे निकृष्टरित्या करणाऱ्या संबंधित ठेकेदार व ग्रामसेवक व पंचायत समिती सांगोला,

बांधकाम विभागाच्या अभियंते यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) नाही, हे खरे नाही,

१५ वा वित्त आयोग दिनांक ०१/०४/२०२० पासून सुरू झालेला आहे. ग्रामपंचायत-हंगीरगे, ता.सांगोला येथील १५ वा वित्त आयोग कामाबाबत कोणतीही तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. सदरबाबत उपअभियंता बांधकाम, उपअभियंता ग्रा.पा.पु. व विस्तार अधिकारी (पं.) यांनी समक्ष भेट देवून पाहणी केली असता ग्रामपंचायत स्वनिधीतून व १५ व्या वित्त आयोगातून केलेली कामे सद्य:स्थितीत सुस्थितीत आहेत. सदरबाबत ग्रामपंचायत स्वनिधीतून व १५ व्या वित्त आयोगातून केलेली कामे निकृष्ट दर्जाची व अस्तित्वात नसल्याची बाब खरी नाही.

(२) सद्य:स्थितीमध्ये ग्रामपंचायत हंगीरगे, ता.सांगोला येथील १५ व्या वित्त आयोगाचा रक्कम रु.८२,००,६९८/- (अक्षरी रू.ब्याऐंशी लक्ष सहाशे अठ्ठयानऊ फक्त/-) इतका निधी शासकीय कपाती व बँक व्याजासह शिल्लक आहे. १५ वा वित्त आयोगाच्या मंजूर आराखड्याप्रमाणे सर्व कामे प्रगतीपथावर असून सद्य:स्थितीमध्ये मंजूर आराखड्यानुसार एकूण रक्कम रु.४०,००,०००/- (अक्षरी रू.चाळीस लक्ष फक्त) इतक्या रक्कमेची कामे प्रगतीपथावर आहेत. माहे फेब्रुवारी, २०२५ अखेर सदरची कामे १००% पूर्ण करून देयके अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल. ग्रामपंचायत हंगीरगे, ता.सांगोला, जि.सोलापूर या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत स्वनिधीमधून तसेच पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यात आलेल्या विकासकामांची यादी सोबत जोडली आहे.

आजपर्यंत सन २०२० ते सन २०२५ या कालावधीमध्ये निधी अखर्चित रहाण्याचे मुख्य कारण म्हणजे ग्रामपंचायत हंगीरगे, ता.सांगोला येथे वारंवार होणारा सरपंचा बदल हा आहे. आता पर्यंत एकूण ८ वेळा सरपंच बदल झालेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलसंधारण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) १७६६८ (२७-०१-२०२६). श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या जलसंधारण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गात सन २०१७ पासून भरती झालेली नसून सदर संवर्गातील ३००० रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरळसेवेची सर्व पदे सन २०२६ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वर्ग करण्याचा शासनाचा मानस आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलसंधारण विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२६-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ अंतर्गत उपविभागीय जलसंधारण अधिकारी,

(स्थापत्य) गट-अ या संवर्गाकरीता ८४ व जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (राजपत्रित) या संवर्गाकरीता १९४ पदांची पदभरतीची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच मुख्य परीक्षा-२०२१ अंतर्गत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-अ या संवर्गाकरीता ११ पदांची पदभरतीची कार्यवाही करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मुख्य परीक्षा-२०२३ अंतर्गत जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (राजपत्रित) या संवर्गाकरीता १० पदांची पदभरतीची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच मुख्य परीक्षा-२०२४ अंतर्गत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट-अ या संवर्गाकरीता २३ पदांचे व जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (राजपत्रित) या संवर्गाकरीता २२ पदांच्या शिफारशी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झाल्या असून पदभरतीची कार्यवाही चालू आहे. तसेच जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) या संवर्गात आयुक्त, मृद व जलसंधारण, छ.संभाजीनगर यांच्याकडून सन-२०१९ मध्ये २८२ व सन २०२३-२४ मध्ये ६७० पदांच्या पदभरतीची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) लागू नाही.

---

## दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालय मंजूर होणेबाबत

**(३७) १८०८४ (२८-०१-२०२६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालय मंजूर होणे बाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री महोदयांना दिनांक १६ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर हे दोन्ही तालुके मोठे असल्याने कामकाज सुरळीत होत नसून मोठ्या प्रमाणात दिरंगाई होत असल्यामुळे सर्वत्र नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग स्वतंत्र करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी करूनही ती मागणी अद्याप पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग स्वतंत्र करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) होय.
(२), (३) व (४) दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालय मंजूर करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडून दिनांक २२/१२/२०२५ रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव तपासून दिनांक २४/१२/२०२५ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अंगणवाडयामध्ये आहार बनवून देण्या-या बचत गट व मदतनीस यांचे आहाराचे दर वाढविणेबाबत

**(३८) १८०८९ (२७-०१-२०२६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढले असताना अंगणवाडीमध्ये बालकांना आहार बनवून देणाऱ्या बचत

गटांना गत आठ वर्षापासून प्रति बालक रु. आठ इतका दर देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या अंगणवाडीमध्ये बचत गट नाहीत तेथे आहार बनवून देणाऱ्या मदतनीसांनाही गत आठ वर्षापासून प्रति बालक रुपये आठ इतका दर देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन बचत गटांना रुपये १८ या दराने तसेच मदतनीस यांना आहार बनविण्याकरिता दुप्पट दर देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (०२-०३-२०२६) :** (१), (२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेतंर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना घरपोच आहार तर ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालके यांना गरम ताजा आहार पुरविण्यात येतो. सदर योजनेकरिता केंद्र व राज्य हिश्याचे खर्चाचे प्रमाणे प्रत्येकी ५० टक्के आहे. पूरक पोषण आहाराचे दर केंद्र शासनामार्फत निश्चित केले जातात. सद्यस्थितीत लागू असलेले पूरक पोषण आहाराचे दर सन २०१७ मध्ये निश्चित करण्यात आलेले असून, ते खालीलप्रमाणे आहेत.

| लाभार्थी प्रकार | प्रति लाभार्थी प्रति दिन दर |
|---|---|
| ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थी | रु.८/- |
| गरोदर महिला व स्तनदा माता | रु.९.५०/- |
| किशोरवयीन मुली | रु.९.५०/- |
| ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालके | रु.१२/- |

पोषण आहाराच्या दरांमध्ये वाढ करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील तलावांच्या कामाच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत**

**(३९) १८३४८ (२७-०१-२०२६). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा व निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील सिमेंट बंधारे, पाझर तलाव दुरुस्ती, कोल्हापूरी बंधारे बांधकाम व दुरुस्ती आणि पाझर तलावाचे साठवण तलावामध्ये रूपांतरण करणे आदी कामांचा मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मृद व जलसंधारण मंत्री यांच्याकडे माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तालुक्यांतील जलसंधारणाची किती कामे मृद व जलसंधारण विभाग, लातूर यांनी प्रस्तावित केली आहेत तसेच या कामांना किती निधीची आवश्यकता आहे,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाची चौकशी करुन मृद व जलसंधारण विभागांच्या कामांना निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) लातुर जिल्ह्यात निलंगा तालुक्यात एकूण २८ कामे प्रस्तावित असुन त्यासाठी रु.२०१८.६८ लक्ष निधी आवश्यक आहे.

(३) प्रस्तावित २८ पैकी १६ कामांची छाननी क्षेत्रीय कार्यालयामार्फ़त प्रगतीपथावर आहे व १२ कामांची अंदाजपत्रके जिल्हा नियोजन समिती, लातुर यांना सादर करण्यात आलेली आहे. पाणलोटनिहाय आराखडा मंजुरीनंतर निधी उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून कामे हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औधोगिक क्षेत्रातील समस्यांमुळे उद्योजक परराज्यात जात असल्याबाबत

**(४०) १८६२७ (२७-०१-२०२६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील औधोगिक क्षेत्रामध्ये दलालांचा वाढता प्रभाव, एमआयडीसीचे भूखंड मूळ किमतींच्या चार ते पाच पट दराने विकणे, भूसंपादनातील त्रुटी, स्थानिकांशी वाद, चढ्या दराने होणारे प्राथमिक खर्च, एमआयडीसीत स्थानिक कंत्राटदारकडून वाहतूक, मजूर पुरवठा बांधकाम आणि इतर सुविधा या बाजार भाव पेक्षा दुप्पट ते तिप्पट दराने देणे, या सर्व कारणामुळे अंबरनाथ एमआयडीसीतील उद्योजक परराज्यात स्थलांतरित करणार असल्याचे दिनांक १० ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन एमआयडीसीतील समस्या सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२०-०४-२०२६) :** (१) व (२) सदर बाब अध्यक्ष, अंबरनाथ मॅन्युफॅक्चर असोसिएशन (आमा) यांनी अंबरनाथ येथे आयोजित पत्रकार परिषदेत नमुद केलेली असून, सदरची बातमी दिनांक १०/०८/२०२५ रोजीच्या दैनिक नवभारत, लोकसत्ता या वृत्तपत्रामध्ये प्रकाशीत झालेली आहे. तथापि, खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंड वाटप धोरणामध्ये अधिक पारदर्शकता, सुसुत्रता आणून स्पर्धात्मक वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने आणि शासनाच्या Ease of Doing Business (EoDB) धोरणाच्या अनुषंगाने भूखंड वाटपाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक, सुसूत्रित गतिमान आणि उद्योगाभिमुख होण्यासाठी मऔवि महामंडळाने मिलाप (MIDC Industrial Land Application & Allotment Portal (MILLAP) हे पोर्टल विकसीत केले असून, सदयस्थितीत सदर पोर्टल मार्फत जागा वाटपाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्याबाबत

**(४१) १८७३० (२८-०१-२०२६). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्याबाबतची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित असून सदर मागणी पूर्ण करण्याबाबत वसई येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळा

महापालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सूचना दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार एकूण ११७ जिल्हा परिषद शाळा महानगरपालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये ग्रामविकास विभाग, मंत्रालय यांचेकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हस्तांतरणाच्या प्रक्रियेस अगोदरच विलंब झालेला असून शाळांच्या दुरुस्तीची, पुनर्बांधणीची व डागडूजीची कामे प्राधान्याने करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषद, पालघर वा महानगरपालिका यापैकी कोणत्या यंत्रणेने ही कामे करावी, याबद्दल संभ्रमावस्था निर्माण झाला आहे, या संभ्रमावस्थेमुळे रखडलेल्या दुरुस्तीमुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळा महापालिकेकडे विनामुल्य हस्तांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (०९-०३-२०२६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. महानगरपालिकेमार्फत निधी उपलब्ध करुन दिलेला असून वर्गखोल्या बांधकामाची व शाळांच्या दुरुस्तीची कामे चालू आहेत.
(४) पालघर जिल्हा परिषदेकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### गोटाटोली (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) या गावाला पक्का रस्ता उपलब्ध करून देणेबाबत

**(४२) १९०५८ (२८-०१-२०२६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोटाटोली (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) हे गाव सरखेड ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत असून या गावाला अद्याप पक्का रस्ता नसल्यामुळे पावसाळ्यात गावाचा संपर्क तुटतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावात पक्का रस्ता नसल्यामुळे आरोग्यसेवा व वाहतुकीची सुविधा उपलब्ध होत नसल्याने आपत्कालीन वेळी स्थानिक नागरिकांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन गोटाटोली या गावाला पक्का रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२५-०२-२०२६) :** (१), (२) व (३) गोटाटोला हे गाव ग्राम पंचायत सरखेडा अंतर्गत येत असून, सदर गावास जोडणारा सरखेडा-मरकनार हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.३८ दर्जाचा आहे. सदर रस्त्याचा संपूर्ण पृष्ठभाग बैलगाडी (Cart Track) स्वरुपाचा आहे.

सन २०२५-२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना, आदिवासी उपयोजना (लेखाशिर्ष ५०५४-०४०२) अंतर्गत सदर रस्त्याचे रु.६०.०० लक्ष इतक्या रक्कमेचे काम मंजूर असून, सदर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक

२७/०१/२०२६ रोजी देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नवी दिल्ली (एम्स) च्या धर्तीवर नवीन रुग्णालय सुरु करणेबाबत

**(४३) १९६०० (२९-०१-२०२६). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नवी दिल्ली (एम्स) च्या धर्तीवर नवीन रुग्णालय सुरु करणेबाबत अथवा येथील रुग्णालयास एम्सचा दर्जा देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात आयुर्वेद अभ्यासक्रमाच्या नवीन भारतीय आयुर्विज्ञान संस्थांच्या (AIIMS) स्थापनेबाबत केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने राज्यात नवीन एम्स स्थापन करण्यास मान्यता देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरून मा. पंतप्रधान महोदय तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग यांना पत्र व्यवहार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर व यावल विधानसभा मतदारसंघातील न्हावी ग्रामपंचायतीला १५ व्या वित्त आयोगाच्या सन २०२३-२४ या वर्षातील निधी न मिळाल्याबाबत

**(४४) १९६१२ (२८-०१-२०२६). श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर व यावल विधानसभा मतदारसंघातील न्हावी ग्रामपंचायत असून, १५ व्या वित्त आयोगाच्या सन २०२३-२४ वर्षातील निधी वितरणाच्या वेळी प्रशासनाने चुकीची माहिती भरल्याने या ग्रामपंचायतीला निधी मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा किती ग्रामपंचायती या तालुक्यात आहेत, तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून चुकीची माहिती कशी व का भरली गेली याची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, न्हावी ग्रामपंचायतीकडे निवडून आलेले सरपंच असूनही त्यांना प्रशासक असलेले गाव म्हणून नोंदवण्यात आले, ही चूक दुरुस्त करून निधी वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गावांच्या विकासकामांवर झालेला परिणाम भरुन काढण्यासाठी व अशा प्रकारे चुकीची माहिती भरुन गावाच्या विकासाचा निधी थांबविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (२०-०२-२०२६) :** (१) होय खरे आहे.

(२) ग्रामपंचायत न्हावी प्र.या. ता.यावल हि एकच ग्रामपंचायत आहे. तालुक्यात एकाच नावाच्या न्हावी प्र.या. ता.यावल व न्हावी प्र.अ. ता.यावल अशा ०२ ग्रामपंचायती असल्याने नाम साधर्म्यामुळे तांत्रिक चूक झाली आहे.

(३) होय. याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रथम दर्शनी ग्रामपंचायतींचे नाम साधर्म्यामुळे तांत्रिक चूक झाल्याचे आढळून आले, तथापि संबंधितांना चुकीची माहिती भरल्याने कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

(५) दिनांक ३१/८/२०२५, दिनांक २३/१/२०२६ आणि दिनांक २/२/२०२६ रोजीच्या पत्रान्व्ये पंचायत राज, भारत सरकार यांच्याकडे निधी मागणी करण्यात आली आहे.

---

## केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला तरी त्याकरीता लागणारा निधी राज्य शासनाला दिला नसल्याबाबत

**(४५) १९६८२ (२७-०१-२०२६). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला मात्र, त्याकरीता लागणारा निधी राज्य शासनाला दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोणताही कार्यक्रम अथवा त्यासंदर्भातील स्पष्ट आदेश आतापर्यंत दिलेले नसतानाही राज्य मराठी भाषा विभागाकडून भारतीय ११ भाषासंदर्भात अभिजात भाषा मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मंडळाच्या ११ सदस्यांच्या नियुक्तीसह अध्यक्ष यांची नियुक्ती कोणत्या आधारावर करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (१८-०२-२०२६) :** (१) केंद्र शासनाच्या दिनांक ३/१०/२०२४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला असून याबाबतची अधिसूचना केंद्र शासनाने दिनांक ४/१०/२०२४ रोजी निर्गमित केली आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर केंद्राकडून निधी मिळविण्यासाठी विहित प्रक्रिया आहे. विभागाच्या शिष्टमंडळाने शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली येथे भेट दिली. सदर भेटी दरम्यान निदर्शनास आले की, अभिजात मराठी भाषेचे प्रकल्प कामकाज केंद्र शासनाच्या सहयोगाने पुढे न्यायचे असेल तर राज्याचे अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) असणे अनिवार्य आहे. या अनुषंगाने दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यामध्ये अध्ययन उत्कृष्टता केंद्र (Centre of Excellence) स्थापनेचा प्रस्ताव केंद्रशासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तद्नंतर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीने दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळाल्यानंतर विविध प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात येतील. अभिजात भाषेचे प्रकल्प/योजना यासाठी केंद्र सरकारकडून उपलब्ध होणाऱ्या निधी संबंधात माहिती घेतली असता, अध्ययन उत्कृष्टता केंद्राच्या पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकारने खर्च करणे आवश्यक आहे. प्रचलित धोरणानुसार केंद्र सरकारकडून मुख्यतः अभिजात भाषेचे अध्ययन व संशोधन यासाठी निधी मिळू शकतो. तसेच फलनि:ष्पत्तीच्या आधारे (outcome basis) प्रकल्पांसाठी निधी मिळू शकतो.

(२) हे खरे नाही, राज्य मराठी भाषा विभागाकडून भारतीय ११ भाषासंदर्भात अभिजात भाषा मंडळ स्थापन करण्याबाबत कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अहिल्यानगर (जि.अहिल्यानगर) येथील नियोजित जागेवर जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाचे बांधकाम सुरु करणेबाबत

**(४६) २०५८३ (२७-०१-२०२६). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर (जि.अहिल्यानगर) येथे जिल्हा महिला व बालविकास कार्यालय मंजूर असून त्या नियोजित जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे सदर कार्यालयाचे बांधकाम सुरू करता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री महोदय यांना दिनांक २३ जुलै, २०२५ तसेच दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी पत्र देऊन कार्यवाही करण्याची मागणी केली आहे, परंतु अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, अहिल्यानगर येथील नियोजित जागेवर जिल्हा महिला व बालविकास कार्यालयाचे बांधकाम सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे (२१-०४-२०२६) :** (१), (२) व (३) अहिल्यानगर (जि.अहिल्यानगर) येथे जिल्हा महिला व बालविकास कार्यालयासाठी मौजे सावेडी, ता. नगर येथील स.न.२३२/१/अ/१ ते ६ येथील ४४११.५० चौ.मी. इतकी जागा भाडे तत्वावर मंजूर करण्यात आलेली होती.

अहिल्यानगर येथे महिला व बालविकास विभागाचे नवीन कार्यालय उभारण्यासाठी नियोजित जागेवरील अतिक्रमण हटवण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी विनंती केली आहे. सदर जागेत अतिक्रमण असल्याने, अहिल्यानगर महानगरपालिका यांचेकडून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

तथापि, महिला व बाल विकास भवन तातडीने होणेसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, अहिल्यानगर यांनी दिनांक १२/१२/२०२५ च्या पत्रान्वये मौजे सावेडी ता.जि.अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या लगत असलेली महसूल व वन विभागाची गट नं. ८९क मधील ० हे. १० गुंठे जागा मागणीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांना सादर केला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सदर जागा हस्तांतरित करणे, ना-हरकत मिळणे व जागा मोजणी करुन मिळणे इ. बाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर जागा प्राप्त झाल्यानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मृद व जलसंधारणाच्या कामांचे जिओ टॅगिंग अत्यंत संथ गतीने होत असल्याबाबत

**(४७) २०६३४ (२७-०१-२०२६). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात व मृद जलसंधारणाच्या सर्व १५,१५,४९६ कामांचे जिओ टॅगिंग दिनांक ३१ मे, २०२५ पर्यंत

करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुदत उलटून गेल्यानंतर देखील माहे जुलै, २०२५ पर्यंत १,९४,१८९ म्हणजे केवळ १३% कामांचे जिओ टॅगिंग करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामांचे जिओ टॅगिंग अत्यंत संथ गतीने होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने या कामांचे जिओ टॅगिंग तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२२-०४-२०२६) :** (१) हो, खरे आहे.

राज्यात मागील अनेक वर्षांत विविध विभागांच्या विविध योजनांव्दारे करण्यात आलेल्या मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (Ground Truthing) करण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक १२/०३/२०२५ अन्वये घेण्यात आलेला आहे.
(२) हो, खरे आहे.
(३) राज्यातील मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी मृद व जलसंधारण विभाग (राज्यस्तर), मृद व जलसंधारण विभाग (जि.प.ल.पा.), वन विभाग, कृषी विभाग आणि रोजगार हमी योजना विभाग या विभागातील अधिकारी / कर्मचारी करणार होते.

परंतु, पडताळणी करावयाच्या संरचनांपैकी बहुतांश संरचनांचे बांधकाम कृषी विभागाने केलेले असताना, कृषी विभागाच्या कर्मचा-यांनी पडताळणीच्या कामास नकार दिल्याने संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी (Ground Truthing) करण्याचा वेग मंदावला.
(४) राज्यातील मृदसंधारण व जलसंधारण संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी मृद व व जलसंधारण विभागातील अधिकारी/ कर्मचारी आणि रोजगार हमी योजनेचे कर्मचारी यांचेमार्फत करण्यात येत असून प्रत्यक्ष स्थळ पडताळणीचे काम प्रगतीपथावर आहे. माहे फेब्रुवारी-२०२६ अखेरपर्यंत सुमारे ११ लक्ष (७२%) संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील काही सिमेंट कॉंक्रीट बंधाऱ्यांच्या कामांना शासन निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत

**(४८) २०९९१ (२७-०१-२०२६). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इगतपुरी-त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील सिमेंट कॉंक्रीट बंधाऱ्याच्या कामांना शासन निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मृद व जलसंधारण मंत्री, यांना दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (२४-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) त्र्यंबकेश्वर तालुक्यातील १२ कामांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले असुन क्षेत्रीय कार्यालयामार्फत अंदाजपत्रके तयार करणे प्रगतीत आहे. पाणलोटनिहाय आराखडा मंजुरीनंतर निधी उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवून कामे

हाती घेण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उमेद कॅडर यांचे विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(४९) २१०२८ (२८-०१-२०२६). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत सर्व कॅडर मागील १० वर्षापासून कार्यरत असून त्याच्या काही मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यात प्रामुख्याने त्यांना मानधन वाढ व्हावी, प्रवासभत्ता मिळावा, ग्रेडेशनची पध्दत बंद करावी, विमा संरक्षण, शासनाच्या रिक्त पदांवर समायोजन इत्यादी मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्या अनुषंगाने या प्रलंबित मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१०-०३-२०२६) :** (१) अशत: खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) संघटनेच्या मागण्याबाबत उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी यांच्याबरोबर नागपूर हिवाळी अधिवेशनात दिनांक १०/१२/२०२५ व ११/१२/२०२५ रोजी बैठक घेतली. तसेच मंत्रालयात देखील उक्त बैठकीतील निर्देशाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा दिनांक २४/०२/२०२६ रोजी संघटने प्रतिनिधी यांचेसह घेतला. नवीन मानवी संसाधन मार्गदर्शक पुस्तिकेनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांना गट अपघात विमा संरक्षण १० लाख ते ३० लाख लागू करण्यात आले आहे. सन २०२३ मध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात २०% मानधनवाढ करण्यात आली आहे. सन २०२४ मध्ये समुदाय संसाधन व्यक्तींच्या मानधन वाढ करण्यात आली आहे. तसेच याव्यतिरिक्त विविध मागण्यांच्या अनुषंगाने नवीन मानवी संसाधन मार्गदर्शक पुस्तिकेच्या अभ्यास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्याला पूर्णवेळ कामगार अधिकारी देणेबाबत

**(५०) २३९०० (२८-०४-२०२६). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री कामगार राज्यमंत्री असूनही जिल्ह्यातील कामगारांच्या हिताचे निर्णय घेणारा आणि त्यांच्या तक्रारींचे निवारण करणारा पूर्णवेळ कामगार अधिकारी नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पदाचा अतिरिक्त पदभार नागपूर येथील महिला अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आल्याने त्या नागपूर येथून कारभार पाहत असल्यामुळे प्रशासकीय कामकाजात सुसूत्रतेचा अभाव असल्याने कामगारांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवण्याकरीता कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत तसेच अनेक नस्त्या (फायली) प्रलंबित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत वर्तमानपत्र व निवेदनाच्या मध्यमातून शासनाचे लक्ष वेधूनही कार्यवाही होत नसल्याने कामगार त्रस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गडचिरोली जिल्हयास पूर्णवेळ कामगार आधिकारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१५-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली हे पद रिक्त असल्याने, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीम. सिमा शिंदे, सरकारी कामगार अधिकारी, नागपूर यांना देण्यात आला होता. सदर अधिकाऱ्याकडून कार्यालयातील दैनंदिन कामकाज पार पाडण्यात येत होते. तथापि, आता दिनांक २७/०२/२०२६ रोजीच्या आदेशान्वये सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.